रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक २३५
www.ramprahar.com

बुधवार, १२ मार्च २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

दोन मोटरसायकलींची धडक; एक ठार, तिघे जखमी/२
नैना परियोजना ८ ते १२च्या लवाद सुनावणीस प्रारंभ/६
राष्ट्रीय कॅरम स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे संघ जाहीर/८

## पंतप्रधान मोदींना मॉरिशसचा सर्वोच्च नागरी सन्मान

**मॉरिशस** : भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी सध्या दोन दिवसांच्या मॉरिशस दौऱ्यावर आहेत.



मॉरिशसचे पंतप्रधान नवीनचंद्र रामगुलाम यांनी मंगळवारी (दि. ११) पीएम मोदी यांना त्यांच्या देशाचा सर्वोच्च पुरस्कार 'द ग्रँड कमांडर ऑफ द ऑर्डर ऑफ द स्टार अँड की ऑफ द इंडियन ओशन' देण्याची घोषणा केली. मॉरिशसचा हा सर्वोच्च पुरस्कार मिळवणारे पंतप्रधान मोदी हे पहिले भारतीय ठरले आहेत. पोर्ट लुईस येथे झालेल्या भारतीय समुदायाच्या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासमोरच रामगुलाम यांनी ही घोषणा केली. यानंतर मॉरिशसच्या सर्वोच्च सन्मानाने सन्मानित केल्याबद्दल पंतप्रधान मोदींनी रामगुलाम यांचे आभार मानले. दरम्यान, पंतप्रधान मोदींना आतापर्यंत विविध देशांकडून २१ प्रतिष्ठेचे पुरस्कार मिळाले आहेत.

# बेकायदा भोंगे रडारवर!

## कुठल्याही प्रार्थनास्थळी ध्वनी मर्यादेचे उल्लंघन झाल्यास कारवाई

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सर्वधर्मीय प्रार्थनास्थळांवरच्या भोंग्यावर आता सरकारची करडी नजर असणार आहे. भोंग्यामुळे परिसरातील लोकांना होणाऱ्या त्रासावरून विधानसभेत भाजप आमदार देवयानी फरांदे यांनी लक्षवेधी मांडली. या लक्षवेधीला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कारवाई करण्याची घोषणा केली.

विधानसभेत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, कुठल्याही प्रार्थनास्थळावर जे भोंगे आहेत त्याची परवानगी घेतली पाहिजे तसेच हे भोंगे रात्री १० ते सकाळी ६पर्यंत बंद असले पाहिजेत. सकाळी ६ ते रात्री १० या काळात सकाळी ५५ डेसिबल आणि रात्री ४५ डेसिबल आवाजाची मर्यादा आहे. त्यापेक्षा जास्त नको

### मुख्यमंत्र्यांची घोषणा



असे काही निर्देश कोर्टाने दिले आहेत. त्याबाबत कायद्यानुसार जर अधिक डेसिबलने एखादा भोंगा वाजत असेल तर त्यावर कारवाईचे अधिकार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला केंद्राने दिले आहेत. पोलिसांनी पुढाकार घेऊन प्रदूषण नियंत्रण मंडळाला कळवायचे आहे. त्यानंतर त्या बोर्डाने पुढची कार्यवाही जे काही आरोपपत्र, कोर्टात खटला भरायचा अशी सध्या कायद्याची परिस्थिती आहे. ज्या प्रकारे या गोष्टीचा अवलंब व्हायला हवा तसा होत नाही. आता कायद्याची अंमलबजावणी झाली पाहिजे.

यापुढे कुणालाही सरसकट भोंग्याची परवानगी देण्यात येणार नाही. जी परवानगी मिळेल ती निश्चित कालावधीसाठीच देण्यात येईल. या कालावधीनंतर पुन्हा भोंगा लावायचा असेल तर त्याची परवानगी पोलिसांकडून घेतली पाहिजे. ज्या ठिकाणी ५५ डेसिबल, ४५ डेसिबल आवाजाच्या मर्यादेचे उल्लंघन होईल तिथे पुन्हा परवानगी देण्यात येणार नाही. जे काही भोंगे असतील त्यांची जप्ती केली जाईल. याबाबत तंतोतंत पालन होतंय की नाही याची जबाबदारी पोलीस निरीक्षकाची असेल. जर पोलीस निरीक्षकाने याकडे दुर्लक्ष केले तर त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

## मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थींना मुदतवाढ

**मुंबई :** राज्यातील मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थींना पाच महिन्याची सरकारने मुदतवाढ दिली आहे. आता मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतील युवकांना एकूण ११ महिन्यांच्या कालावधीसाठी प्रशिक्षण घेता येणार आहे.

सध्या जे एक लाख १० हजार प्रशिक्षणार्थी ज्या पदावर कार्यरत आहेत, त्यांना पाच महिन्यांची मुदतवाढ देण्यात येणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात जाहीर केले होते. त्यानंतर या योजनेसंदर्भातील नवा जीआर प्रसिद्ध करण्यात आला आहे. त्यामध्ये पुढील कालावधीसाठी मुदतवाढ दिली जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. ज्यांचे सहा महिन्यांचे कार्य प्रशिक्षण पूर्ण झालंय त्यांना आणखी पाच महिने प्रशिक्षण घेता येईल.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर यांचा यमुना स्त्री सन्मान पुरस्काराने गौरव

## सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील भरीव योगदानाची दखल

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इतिहासात तसेच आजच्या आधुनिक युगातही अनेक महिलांनी विविध क्षेत्रामध्ये आपले नाव कोरले आहे. स्त्रिया फक्त घर सांभाळणाऱ्या किंवा समाजातील पारंपरिक भूमिका निभावणाऱ्या व्यक्ती नाहीत, तर त्या समाजाची प्रगती आणि विकासाच्या मुख्य आधारस्तंभ आहेत. यामध्ये आदरणीय व्यक्तिमत्व सौ. शंकुतला रामशेठ ठाकूर यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. या अनुषंगाने त्यांना यमुना स्त्री सन्मान पुरस्काराने मंगळवारी (दि. ११) गौरविण्यात आले.

काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या मातोश्री दिवंगत यमुनाबाई तुकाराम घरत यांच्या अकराव्या स्मृतिदिनानिमित्त यमुना सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वतीने पनवेल तालुक्यातील शेलघर येथे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या वेळी सौ. शंकुतला ठाकूर यांना सुप्रसिद्ध सिने अभिनेत्री मृणाल कुलकर्णी यांच्या हस्ते यमुना स्त्री सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला.

दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सन्मान सोहळ्यास प्रमुख मान्यवर म्हणून भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, शिवसेना 'उबाठा'चे संपर्क प्रमुख बबन पाटील, शिक्षक नेते दा.चां. कडू,




संस्थेचे संस्थापक महेंद्र घरत, सचिव शुभांगी घरत, राम म्हात्रे, रघुनाथ घरत, राजेंद्र पडते, डॉ. मनीष पाटील, मिलिंद पाडगावकर, कामगार नेते वैभव पाटील, किरीट पाटील आदी उपस्थित होते.

थोर देणगीदार लोकनेते रामशेठ ठाकूर व कुटुंबियांनी रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी सातत्याने भरीव मदत करून या संस्थेच्या प्रगतीसाठी नेहमीच मोलाचा हातभार लावला आहे. आजपर्यंत १०० कोटींहून अधिक रुपयांची देणगी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी रयत शिक्षण संस्थेला दिली आहे. कर्मवीर अण्णांच्या विचाराने प्रेरित होऊन त्यांचा शैक्षणिक वारसा जपण्याचे कार्य लोकनेते रामशेठ ठाकूर अखंडपणे करीत आहेत. थोर समाजसुधारक स्व. जनार्दन भगत यांची कन्या आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला ठाकूर यांनीही रयत शिक्षण संस्थेला कोट्यवधी रुपयांची देणगी दिली आहे. शिक्षण क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रात त्यांचे कार्य उल्लेखनीय आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहिले आहेत. सामाजिक भावनेतून कार्य करताना ते आज समाजाचे आधारस्तंभ बनले आहेत. त्याचबरोबर त्यांच्या अर्धांगिनी सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर यांनीही सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात स्वतःला झोकून दिले आहे. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या विधायक कार्यात सौ. शकुंतला ठाकूर यांचा मोलाचा वाटा आहे. याबद्दल त्यांचा यमुना शैक्षणिक सामाजिक व शैक्षणिक संस्थेच्या वतीने गौरव करण्यात आला.

**यमुना स्त्री सन्मान पुरस्काराने यांचा झाला सन्मान!**

सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर (सामाजिक व शैक्षणिक), सुप्रसिद्ध अभिनेत्री मृणाल कुलकर्णी (कला), प्रमदा बिडवे (प्रशासन), डॉ. शीतल जोशी, डॉ. समिधा गांधी, डॉ. कीर्ती समुद्र, डॉ. प्रकाश निघूकर व डॉ. जिज्ञासा विजय कडू (वैद्यकीय), सुरेखा म्हात्रे (शैक्षणिक), अनुराधा उरसल, रिया पाटील व प्राची ठाकूर (कला).

## निवडक

### पाकिस्तानमध्ये रेल्वेगाडीवर दहशतवादी हल्ला; प्रवासी ओलीस

**पेशावर** : पाकिस्तानमधील बलुचिस्तान प्रांतात बलुचिस्तान फुटीरतावाद्यांनी सुमारे ५०० प्रवाशांना घेऊन पेशावरला जाणाऱ्या जाफर एक्स्प्रेसवर हल्ला केला. ही ट्रेन त्यांनी हायजॅक केली आहे. बलुचिस्तान लिबरेशन आर्मी (बीएलए) या फुटीरतावादी संघटनेने या हल्ल्याची जबाबदारी स्वीकारली असून रेल्वेगाडीतील सुरक्षा दलांसह १८०हून अधिक प्रवाशांना ओलीस ठेवल्याचा दावा केला आहे. दहशतवाद्यांनी २० पाकिस्तानी लष्करी जवानांना ठार मारल्याचेही सांगितले जात आहे.

### कशेडी बोगद्यातील दोन्ही मार्गिकेमधून वाहतूक सुरू

**पोलादपूर** : मुंबई-गोवा महामार्गावरील कशेडीतील दोन्ही बोगदे सोमवारी सायंकाळपासून पूर्ण क्षमतेने वाहतुकीसाठी खुले करण्यात आले आहेत. वीजपुरवठा खंडित झाल्यास वाहतुकीत अडथळा निर्माण होऊ नये याकरिता जनरेटरची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. कायमस्वरुपी वीजपुरवठ्यासाठी अनामत रक्कम भरण्याची प्रक्रिया अंतिम टप्यात आहे.





**मुंबई : छत्रपती शिवाजी महाराजांचे थोरले पुत्र आणि हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती संभाजी महाराज यांनी क्रूर मुघल बादशाह औरंगजेबाचा अत्यंत धैर्याने सामना करीत स्वराज्याच्या संरक्षणासाठी संपूर्ण आयुष्य समर्पित केले. संभाजीराजांच्या प्रतिमेस त्यांच्या बलिदान दिनानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील, भाजप पनवेल शहर अध्यक्ष अनिल भगत यांनी मंगळवारी विधानभवनात पुष्प अर्पण करून अभिवादन केले.**

# महापालिका कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी संपूर्ण सहकार्य –माजी सभागृह नेते परेश ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेतील कंत्राटी कामगारांचा मेळावा म्युन्सिपल एम्प्लॉईज युनियनच्या वतीने सोमवारी (दि. १०) ज्येष्ठ नागरिक संघाच्या सभागृहात आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्याचे उद्घाटन माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते झाले. या वेळी बोलताना त्यांनी, कर्मचाऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी आम्ही कटीबद्ध असून भारतीय जनता पक्ष यासाठी कार्यरत राहील, अशी ग्वाही दिली.

म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष अ‍ॅड. सुरेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या मेळाव्यास माजी नगरसेवक नितीन पाटील, अजय बहिरा, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, युवा मोर्चाचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, युनियनचे कार्याध्यक्ष संतोष पवार, सरचिटणीस व मेळाव्याचे आयोजक अनिल जाधव, विभागीय अध्यक्ष शैलेश गायकवाड, अंकुश गायकवाड उपस्थित होते. या



म्युन्सिपल एम्प्लॉईज युनियनतर्फे मेळावा

वेळी कामगारांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा झाली तसेच उपस्थित मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

या मेळाव्यात माजी नगरसेवक नितीन पाटील यांची युनियनचे सल्लागार म्हणून, तर युनियन कार्यालय प्रमुख म्हणून महेंद्र गायकवाड यांची निवड करून त्यांचा सत्कार करण्यात आला.

ऑल इंडिया फायर सर्व्हिसेस स्पोर्ट्स अ‍ॅण्ड फायर सर्व्हिसेस मीट २०२५मध्ये मिळविलेल्या उत्तुंग यशाबद्दल पनवेल महापालिकेच्या अग्निशमन दलातील शुभांगी घुले व तेजश्री साळुंखे यांचा तसेच अग्निशमन विभागातील पहिल्या महिला वाहनचालक कम ऑपरेटर गीतांजली पाटील यांचाही या वेळी सत्कार करण्यात आला. मेळाव्यास उपस्थितांचे आभार कोषाध्यक्ष दत्तगुरू म्हात्रे यांनी मानले.

# रायगड जिल्ह्यात शिमगोत्सवाची धूम!

**माणगाव : बातमीदार, प्रतिनिधी**

कोकणात गणेशोत्सवाखेरिज होळीचा सण मोठ्या उत्साहात आणि पारंपरिक पद्धतीने साजरा केला जातो. या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्याच्या माणगाव तालुक्यातील तासगाव आदिवासीवाडी वारली शैलीच्या चित्रांनी सजली आहे. पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीने त्यांच्या सामाजिक उत्तरदायित्व उक्रमांतर्गत सांस्कृतिकदृष्ट्या समृद्ध हा उपक्रम राबवला.

## वारली चित्रांनी तासगाव आदिवासीवाडी नटली

तासगाव आदिवासीवाडीतील समाजमंदिर व आजूबाजूच्या ११ घरांच्या भिंती वारली चित्रकलेने सुशोभित करण्यात आल्या आहेत. आदिवासी जीवनशैली, निसर्गाशी त्यांचे असलेले नाते तसेच पारंपरिक सण-उत्सवांचे सौंदर्य या कलेमधून सहज उलगडते. यासोबतच औषधी वनस्पतींच्या महत्त्वाची पुनर्उजळणी करत परिजातक, वेखंड, अश्वगंधा, तुळस, गवती चहा, कोरफड यांसारख्या वनस्पतींची रोपे देण्यात आली. वारली कला ही आदिवासी संस्कृतीच्या समृद्ध वारशाचे प्रतीक आहे आणि या उपक्रमाने तिच्या जतनासाठी नवा दृष्टिकोन दिला. या उपक्रमाचे उद्घाटन सोमवारी आदिवासी नृत्याने सुरुवात करीत मोठ्या उत्साहात झाले. पोस्को महाराष्ट्र स्टील कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक वू सुक चोई, संचालक जी. युन. पार्क आणि इतर वरिष्ठ अधिकारी या सोहळ्याला हजर होते तसेच स्थानिक ग्रामस्थ, विद्यार्थी आणि महिला मोठ्या संख्येने हजर होत्या. या वेळी कंपनीच्या अधिकाऱ्यांनीही वारली कलेच्या अनुभवामध्ये सहभागी होत आदिवासी संस्कृतीशी जवळीक साधली.





# श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून अथर्व जाधवला उच्च शिक्षणासाठी आर्थिक मदत

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

परदेशातील वैद्यकीय शिक्षणासाठी अथर्व हरीश जाधव याला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाकडून अडीच लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली. मदतीचा धनादेश माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते अथर्वचे वडील हरीश जाधव यांच्याकडे मंगळवारी (दि. ११) सुपूर्द करण्यात आला.

सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा, सांस्कृतिक, आरोग्य अशा विविध क्षेत्रात गेल्या तीन दशकांपेक्षा जास्त वर्षांपासून उल्लेखनीय कार्य करणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मदतीचा हात देऊन स्वतःच्या पायावर उभे केले जाते. खारघर येथील अथर्व रशिया देशातील युरल स्टेट मेडिकल युनिर्व्हसिटीमध्ये एमबीबीएस हे वैद्यकीय शिक्षण घेणार आहे. त्यासाठी त्यांना आर्थिक मदतीची आवश्यकता होती. त्यानुसार मदत करण्यात आली असून मदतीचा धनादेश लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. या



वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अथर्वच्या पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

या वेळी भटके विमुक्त आघाडीच्या महिला अध्यक्ष विद्या तामखडे, मंडळाचे व्यवस्थापक अनिल कोळी उपस्थित होते. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या या उपक्रमामुळे अनेक होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मोठी मदत मिळते. अशा प्रकारे समाजातील गुणवंत आणि गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद आहे. त्यामुळे अथर्व जाधवला दिलेल्या या आर्थिक सहाय्यामुळे त्याचे वैद्यकीय शिक्षणाचे स्वप्न साकार होण्यास मदत होणार आहे.

# सौर ऊर्जेवर आधारित विजेसाठी राज्याची स्वतंत्र नवीन योजना आणणार -मुख्यमंत्री

**मुंबई : प्रतिनिधी**

केंद्र शासनाने ० ते ३०० युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना' आणली आहे. या योजनेच्या माध्यमातून अशा ग्राहकांना 'रूट टॉप सोलर' पॅनल देण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या या योजनेला सहाय्यकारी असणारी राज्याची स्वतंत्र योजना शासन आणणार आहे, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रश्नोत्तराच्या तासात विधानसभेत दिली.



वीज दरवाढीबाबत सदस्य मुरजी पटेल यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य भास्कर जाधव यांनी सहभाग घेतला.प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना मुख्यमंत्री म्हणाले, राज्यात विजेचे दर कमी करण्यासाठी शासन प्रयत्न करत आहे. महाराष्ट्र वीज नियामक आयोगाकडे शासनाने पुढील पाच वर्षासाठीचा बहुवार्षिक वीजदर याचिका (मल्टीइयर टारीफ पिटीशन) सादर केली आहे. यामुळे राज्यात पुढील पाच वर्षात दरवर्षी विजेचे दर कमी होणार आहे. देशात असणाऱ्या वीज नियामक आयोगापैकी महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे पुढील पाच वर्षासाठी दरवर्षी विजेचे दर कमी होणारी याचिका सादर करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे.

या प्रश्नाच्या उत्तरात अधिक माहिती देताना मुख्यमंत्री म्हणाले, मुंबई शहरासाठीदेखील बेस्ट, टाटा पॉवर, अदाणी व महावितरण या वीज वितरण कंपन्यामार्फतही वीज नियामक आयोगाकडे बहुवार्षिक वीजदर याचिका सादर करण्यात आली आहे. मुंबई शहरात मोठ्या इमारतींना पारंपरिकसोबत अपारंपरिक पद्धतीनेही विजेची उपलब्धता करण्यात येत आहे. सध्या अस्तित्वात असलेल्या क्षमतेपेक्षा ज्या इमारतींमध्ये जास्त वीज उपलब्ध करण्याची क्षमता असेल, अशा इमारतींबाबत नव्याने योजना करण्याचा शासनाचा विचार आहे.

विजेचे दर मान्य करण्याचे अधिकार नियामक आयोगाला आहेत. शासन पुढील पाच वर्षासाठीचे दर निर्धारित करून आयोगाला मान्यतेसाठी सादर केले आहे. त्यानुसार सर्व नियामक प्रक्रियेचा अवलंब करून त्या आधारे २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीसाठी वीजदर आदेश जारी करण्यात येतील. त्यानुसारच वीज वितरण कंपन्यांकडून वीज दराची आकारणी करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी सांगितले.

## दोन मोटरसायकलींची धडक

**एक ठार, तिघे जखमी**

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली-पेण रस्त्यावर आलाना कंपनीसमोर २ मोटारसायकल समोरा समोर धडकल्याने मोटारसायकल वरील ३ जण गंभीर जखमीं झाले तर एक पादचारी जखमी झाला. एकाला रुग्णालयात दाखल करण्यापूर्वीच मृत्यू झाला तर इतर ३ जणांवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत

खोपोली-पेण मार्गावरील सारसंग गावाजवळ अलाना कंपनी च्या गेट समोर पाली फाटा बाजुने नाका कामगार संध्याकाळी काम आटोपून खोपोली येथील घरी परतत असताना अलाना कंपनी समोर आले असता खोपोली कडून भरधाव वेगात येणाऱ्या मोटारसायकलने समोरा समोर जोरात धडक दिली. या धडकेत दोनही मोटारसायकल वरील ३ जण गंभीर जखमीं झाले. तर एक पादचारी जखमी झाला. यामध्ये चंदन ४० पुर्ण नाव माहीत नाही नाक्यावर काम करणारा बांधकाम (मिस्त्री) याचा उपचारासाठी दाखल करण्यापूर्वीच मृत्यू झाला अपघातातील चौथी व्यक्तीही पादचारी असून जलील अहमद ४० साक्षी ट्रान्सपोर्ट. ट्रकचालक जलील अहमद रस्त्यावरून चालत जात असताना मोटर सायकलची धडक बसली. खोपोली नगरपालिका रुग्णालयात उपचार सुरू आहेत

## 'इसांबे पोलीस मदत केंद्रामुळे कायदा सुव्यवस्था राखली जाईल'

**खोपोली, चौक : प्रतिनिधी**

सिनेमात पोलीस गुन्हा घडल्यानंतर पोहचतात ,आरोपीला मदत करतात अस चित्रण असते परंतु रायगड पोलीस मात्र कर्तव्य दक्ष असून सर्व सामान्य नागरिकांच्या मदतीला धावून जात असल्याचे सांगत शाब्बासकीची थाप विशेष पोलीस महानिरीक्षक कोकण परिक्षेत्र संजय दराडे यांनी दिली. खालापूर पोलीस ठाणे अंतर्गत इसांबे येथे सुरू झालेल्या पोलीस मदत केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.



सावरोली खारपाडा मार्गावर नव्याने विकसित होणाऱ्या औद्योगिक भागात एखादी पोलीस चौकी असावी अशी मागणी स्थानिक नागरिकांनी जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षक रायगड यांच्याकडे केली होती. खालापूर पोलीस ठाण्यापासून १३ किलोमीटर अंतरावर हा परिसर असून या परिसरात आठ गावे दहा वाड्या, सत्तेचाळीस कारखाने आहेत. या भागात परराज्यातून आलेले कामगार तसेच वाढलेला वाहतुकीचा ताण कारखानदारीमुळे वाढती गुन्हेगारी यावर वचक बसावा यासाठी इसांबे पोलीस मदत केंद्र सुरू करण्यात आले आहे.

मदत केंद्राच्या उद्धघाटनाला रायगड पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे,अपर पोलीस अधीक्षक, रायगड अभिजीत शिवथरे, उपविभागीय पोलीस अधिकारी खालापूर विक्रम कदम, खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार, रसायणी पोलीस निरीक्षक संजय बांगर, खोपोली पोलीस निरीक्षक शीतलकुमार राऊत उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी पोलीस मदत केंद्र उभारणी करण्यासाठी मदत करणा-या सर्वांचे आभार मानले.

याठिकाणी बीट अंमलदार आणि एक पोलीस शिपाई चोवीस तास तैनात राहणार असल्याचे पोलीस निरीक्षक पवार यांनी सांगितले. कार्यक्रमाचे आभार सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी यांनी मानले.

## ध्वजदिन निधीसाठी पाच लाखांचा धनादेश रायगड जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

उरणच्या धुतूम गावचे माजी सरपंच धनाजीशेठ ठाकूर यांनी आपल्या वाढदिवसानिमित्त सलग चौथ्यांदा ध्वजदिन निधीसाठी मदतीचा रुपये पाच लाखचा धनादेश जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्याकडे सूपूर्द केला. त्यांच्या या मदतीबद्दल जिल्ह्यातील माजी सैनिकांनी अभिनंदन केले आहे.

यावेळी धनाजी ठाकूर यांचे चिरंजीव अॅड.किशोर ठाकूर उपाध्यक्ष, उरण तालुका बार असोशिएशन, धुतूम गावचे माजी उपसरपंच सदानंद विठ्ठल ठाकूर व जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाचे ले.कर्नल राहुल वैजनाथ माने (नि.) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग व कार्यालयातील कर्मचारी उपस्थित होते.

सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या अखत्यारीतील रायगड जिल्ह्यामधील जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून युध्द विधवा, माजी सैनिक, माजी सैनिक विधवा व त्यांचे पाल्य यांच्याकरीता विविध कल्याणकारी योजनांद्वारे आर्थिक मदत देण्यात येते. विविध कल्याणकारी योजनांसाठी जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ध्वजदिन निधी संकलन समिती मार्फत ध्वजदिन निधी संकलित केला जातो. अशा ध्वजदिन निधीस जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांचे अधिकारी व कर्मचारी, स्वेच्छेने निधी देणारे दानी व्यक्ती यांच्याकडून निधी संकलित केला जातो.

माजी सैनिकांचे कल्याणार्थ ध्वजदिन निधीस सढळ हाताने योगदान द्यावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड ले.कर्नल राहुल वैजनाथ माने (नि.) यांनी केले आहे.

## कर्जतला छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**कर्जत : प्रतिनिधी**

छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित कर्जत तालुक्यातील शिवप्रेमी नागरिकांनी अभिवादन केले. कर्जत दहिवली नाका येथे छत्रपती संभाजी महाराजांचे स्मारक असून तेथे अभिवादन करण्यासाठी शिवप्रेमी यांनी गर्दी केली होती.

छत्रपती संभाजी महाराज स्मारक येथे बलिदान दिनानिमित्त अभिवादन करण्यासाठी तरुणांची मोठी गर्दी झाली होती.



## संवेदना चॅरिटेबल संस्थेकडून जय जवान जय किसान विषयावर महिला दिन साजरा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

या मातृभूमीच्या कुशीत जन्म घेतला म्हणून सार्थ अभिमान असलेले आपण, मातीला आई मानणारी आपली भारतीय संस्कृती, या मातीत जन्मलो याच मातीत देह अर्पण करून परत देशसेवेसाठी याच मातीत जन्म घ्यावा ही इच्छा असलेले, सीमेवर आपल्या देशाचे रक्षण करणारे आपले जवान तर प्राणापेक्षा प्रिय अश्या ह्या भारत भूमीत उन्हातान्हात शेतात राबून आपल्यासाठी अन्नधान्य पिकवणारे किसान ही दोन अनमोल रत्ने आहेत.

भारतीय अर्थ व्यवस्थेचा कणा म्हणजेच किसान आणि सीमेवर खडा पहारा देणारा जवान आहेत म्हणून आज आपण आपले आयुष्य घरात राहून आरामात जगत आहोत.याची 'जाणीव आणि जागृती' हाच महिलादिनाचा विषय घेऊन कार्यक्रम करण्यात आला.

परंतु आपण प्रत्येक व्यक्तीने भूमातेच्या ऋणात राहून आपले मातृभूमीचे ऋण फेडण्यासाठी सीमेवर जाऊन लढायला पाहिजे असे नसून रोजचा एक तास समाजकार्यासाठी द्यावा. त्यासाठी घरच्याबाहेर पडण्याची गरज नाहीतर घरात राहूनही आपण सध्या भेडसावत असलेल्या ओला-सुका कचरा या राष्ट्रीय पातळीवरील समस्येत आपले योगदान देऊन हे ऋण फेडू शकतो. संस्थेच्या

चला निसर्गाकडे परत जाऊ या या उपक्रमात सहभागी होऊन संस्थेने चालू केलेल्या सुका कचरा वर्गिकरण या चळवळीत भाग घेऊनही या मातीची सेवा करू शकतो. असे अध्यक्षा सूनेत्रा गावाणकर यांनी सांगितले

महिला दिनाचे औचित्य साधून संस्थेतील महिलांचे समाजाप्रती द्रातृत्व वाढीस लागून एक जबाबदार व्यक्ति म्हणुन सामाजिक कार्यात सहभागी होणाऱ्या महिलांना या वेळी सन्मानित केले जाते. यावेळी मिसेस संवेदना २०२५ हा पुरस्कार प्रग्ना गावडे, स्त्रिशक्ती पुरस्कार अनघा भाताणकर तर अहिल्या पाटील, प्रभा पाटील आणि अरुणा लाडे यांना हरित योद्धा हा पुरस्कार देऊन सन्मानित केले गेले.

## आदिवासी शेतकऱ्यांनी उत्पादक संघटना स्थापन करून नावलौकिक वाढवावा -विनायक काशीद

**कर्जत : रामप्रहर वृत्त**

आधुनिक स्पर्धेच्या युगात टिकण्यासाठी शासकीय योजनांचा लाभ घेत आदिवासी शेतकऱ्यांनी ' शेतकरी उत्पादक संघटना 'स्थापून शेतमालाचे ब्रँडिंग करीत नावलौकिक वाढवावा , असे आवाहन महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे तसेच डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोलीच्या कार्यकारी परिषदेचे सदस्य विनायक काशीद यांनी केले.



कृषी संशोधन केंद्र, पालघर तर्फे डहाणू तालुक्यातील वणई ग्राम पंचायत सभागृहात एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान अंतर्गत ' मसाला पिकांची लागवड व व्यवस्थापन तंत्रज्ञान ' या विषयावरील प्रशिक्षण व निविष्ठा वाटप कार्यक्रमात अध्यक्षीय मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

व्यासपीठावर प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जतचे सहयोगी संशोधन संचालक डॉ. भरत वाघमोडे,कृषी संशोधन केंद्र, पालघरचे प्रभारी अधिकारी डॉ. अमोल दहिफळे,वणईच्या सरपंच कामिनी जनाठे,उपसरपंच अशोक तल्हा,कृषी संशोधन केंद्र कोसबाडचे कार्यक्रम सहायक अशोक भोईर आणि गृह विज्ञान विशेषज्ञ रुपाली देशमुख, मंडळ कृषी अधिकारी उमेश पवार उपस्थित होते.

काशीद पुढे म्हणाले की,आदिवासी शेतकऱ्यांना निविष्ठा, तांत्रिक सेवांपासून प्रक्रिया आणि विपणनापर्यंतची सर्व माहिती देण्याची गरज असून शेतकऱ्यांची स्पर्धात्मकता वाढविणे आणि उदयोन्मुख बाजारपेठेच्या संधीमध्ये त्यांचा फायदा वाढविणे आवश्यक आहे. शेतीचे नवतंत्रज्ञान कळण्यासाठी कृषी विभागाने आदिवासी शेतकऱ्यांच्या शैक्षणिक सहली दापोली कृषी विद्यापीठात आयोजित कराव्या. कृषी विद्यापीठाने तयार केलेले विविध अॅप्स व युट्युबवरील माहिती भ्रमणध्वनीत डाऊनलोड करण्याची रीत शिकवावी.पालघर जिल्ह्यात कृषी महाविद्यालय आणि मत्स्य महाविद्यालय स्थापन करण्याचे सूतोवाच त्यांनी केले.

## एम-आरएनए आधारित लसींसाठी भारत आणि बेल्जियमची भागीदारी



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताच्या जैवतंत्रज्ञान क्षेत्रात मोठी भर टाकणारी घोषणा नुकतीच करण्यात आली आहे. टेकइन्व्हेन्शन लाइफकेअर प्रा. लि. आणि बेल्जियममधील क्वांटूम बायोसायन्सेस यांनी एक महत्त्वपूर्ण भागीदारी केली आहे.

या सामंजस्य करारावर बेल्जियन इकॉनॉमिक मिशन अंतर्गत स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. या ऐतिहासिक क्षणी बेल्जियमच्या राजकन्या, हर रॉयल हायनेस प्रिन्सेस अस्ट्रिड, तसेच दोन्ही देशांतील उद्योग क्षेत्रातील दिग्गज आणि तज्ज्ञ उपस्थित होते.

भारतातील जैवतंत्रज्ञान क्षेत्रासाठी एक मोठी झेप घेतली आहे. मुंबईत टेकइन्व्हेन्शनच्या 'ग्लोबल कोलॅबोरेटिव्ह सेंटर फॉर मेडिकल काउंटरमेझर्स'मध्ये ईयू-जीएमपी मान्यताप्राप्त उत्पादन सुविधा उभारली जात आहे, जिथे पूर्ण क्षमतेने एम-आरएनए आधारित औषधांचा विकास होईल.

## राष्ट्रीय सेवा योजनेंतर्गत एकात्मता शिबिरात ११ राज्यांचा सहभाग

**माणगाव : बातमीदार**

राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत राष्ट्रीय एकात्मता शिबिराचे आयोजन शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथे दिनांक १६ फेब्रुवारी ते २२ फेब्रुवारी दरम्यान करण्यात आले होते.यामध्ये भारतातील ११ राज्यांनी सहभाग घेतला होता.

शिबिराचा मुख्य उद्देश एक भारत श्रेष्ठ भारत अंतर्गत विविध कार्यक्रमा मधून संस्कृती ,भाषा तसेच वेशभूषा यांचे सादरीकरण , देवाणघेवाण व विविध माध्यमातून विकसित भारतासाठी साहाय्य करणे हा होता. महाराष्ट्रातील दहा विद्यापीठांनी या शिबिरात सहभाग घेतला होता.मुंबई विद्यापीठ ,कोकण कृषी विद्यापीठ दापोली व एच.एन.एस.सी मुंबई ,यांचे विद्यार्थी दोशी वकील महाविद्यालय गोरेगाव, रायगड यांच्या छडड कार्यक्रम अधिकारी डॉ. नीलिमा मिरजकर यांचा नेतृत्वाखाली खाली सहभागी झाले होते.



मुंबई विद्यापीठांतर्गत ठाणे, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या भागातील विविध महाविद्यालयातील एन,एस,एस स्वयंसेवकांच्या संघाने सांस्कृतिक, क्रीडा तसेच विविध स्पर्धामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्या बद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. बी. टी. शिर्के यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र दिले

**दुखवटा**

### हौसाबाई म्हात्रे



**उरण :** पाले गावच्या सामाजिक कार्यकर्त्या हौसाबाई गणेश म्हात्रे (७६)यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या मागे त्यांचा मुलगा,सून आणि नातवंडे असा त्यांचा मोठा परिवार आहे.त्यांचा दशक्रिया विधी खोपटे खाडीपूल येथील नानी पार्क येथे १८ मार्च रोजी तर उत्तरकार्य १९ मार्च २०२५ रोजी पिरकोन - आवरे रोड येथील राहत्या घरी पाले येथे करण्यात येणार आहे ी नातवंडे असा परिवार आहे दहावे १४ मार्च रोजी तर उत्तरकार्य १७ मार्च रोजी राहत्या घरी होणार आहे.

### गणेश देवघरे

**मोहोपाडा :** रसायनी पाताळगंगा परिसरातील इसांबे येथील कै. हभप गणेश भास्कर देवघरे यांचे अल्प आजाराने निधन झाले.त्यांच्यावर इसांबे स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांचा दशक्रिया विधी रविवार दि.१६ मार्च रोजी श्री क्षेत्र धाकटी पंढरी माजगाव येथे होणार आहे.त्याच्या पश्चात मुले,सुना,नातवंडे,पातवंडे असा परिवार आहे.वारकरी पायी दिंडी सोहळा,श्री ज्ञानेश्वरी गाथा पारायण सप्ताहात नेहमीच अग्रेसर असायचे.



# खारघरच्या पाणीप्रश्नी भाजपचे सिडकोला निवेदन

## सुरळीत पाणीपुरवठ्यासाठी नेत्रा पाटील यांचा पाठपुरावा

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर शहरातील बहुतांश सेक्टरमध्ये कमी दाबाने पाणी पुरवठा होत आहे. जवळपास सर्वच सेक्टरमध्ये पाण्याचा प्रश्न गंभीर झालेला आहे. पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली सिडकोच्या सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांची भाजप नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांनी विविध सेक्टरमधील नागरिकांसह भेट घेतली व त्यांना खारघर शहरातील होणाऱ्या अपुऱ्या पाणीपुरवठा बाबत तसेच तीव्र पाणीटंचाई बाबत कल्पना दिली.

खारघर शहरातील माझ्या प्रभागातील सेक्टर ११,१३,१९,२० व २१ तसेच खारघर व मुरबी गावातील पाण्याचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला आहे. वेळोवेळी सिडकोला अनेक सोसायटी यांनी पत्रव्यवहार केलेला आहे.




परंतु सिडको प्रशासनाकडून कुठलीही ठोस उपाययोजना आतापर्यंत करण्यात आली नसल्यामुळे सोसायटीतील नागरिक त्रस्त झाले आहेत. सेक्टर १९ तसेच सेक्टर २१ या दोन्ही सेक्टर मधील काही सोसायट्यांना पाणीपुरवठा हा नेहमीच म्हणजे वर्षभर कमी दाबाने होत असतो. याबाबतीत कार्यकारी अभियंता पाणीपुरवठा विभाग सिडको यांना कल्पना देऊनदेखील कुठलीही उपाययोजना करण्यात आली नसल्याचे सदर सोसायटीतील नागरिकांची तक्रार आहे.

नुकताच मार्च महिना सुरू झाला आहे मागील आठवड्याभरापासून काही ना काही कारणाने सिडकोचे पाणी एक तर कमी दाबाने येत आहे किंवा येतच नाही त्यामुळे नागरिक त्रस्त झालेले आहेत. संपूर्ण उन्हाळा अजून जायचं आहे व आत्तापासूनच नागरिकांना प्रायव्हेट पाण्याचे टँकर मागवावे लागत आहेत व त्याचा आर्थिक भार त्यांना सहन होण्यासारखा नाही. याबाबतीत लवकरात लवकर योग्य त्या उपाययोजना कराव्यात अशी सर्व रहिवाशांच्या वतीने सिडको प्रशासनाला विनंती करण्यात आली. गणेश देशमुख सह व्यवस्थापकीय संचालक सिडको यांनी नागरिकांना आश्वासित केले की लवकरच बाळगंगा धरणाचा महत्त्वपूर्ण टप्पा पार पडल्यानंतर सर्वांनाच मुबलक प्रमाणात पाणी मिळेल. तसेच न्हावा सेवा टप्पा ३ ची पाईपलाईन देखील लवकरात लवकर सुरू करण्यासाठी सिडको प्रशासन प्रयत्न करत आहे. रहिवाशांनी सिडको व्यवस्थापनाला त्यांच्या रोजच्या होणाऱ्या त्रासातून मुक्तता व्हावी अशी विनंती केली.

आजच्या बैठकीत भाजप ज्येष्ठ नेते दिलीप जाधव, जयवंतराव पाटील, सावित्री राव, शुभलक्ष्मी शिवाकुमार, शैलेंद्र शेजवळ, डॉ.स्वामीनाथ ढवळे, शशी कुमार, भूषण मुळे, भाजप उद्योग आघाडीचे संयोजक भरत कोंढाळकर, भाजपा युवा मोर्चा सचिव आदित्य हातगे, प्रशांत पाटील यासह नागरिक उपस्थित होते.

> **आपण पाण्याचा प्रश्न गंभीरतेने घ्यावा. हा प्रश्न मार्गी न लागल्यास पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली सिडकोवर मोर्चा काढण्यात येईल अथवा जन आंदोलन छेडण्यात येईल.**
>
> **–किरण पाटील, खारघर मंडल उपाध्यक्ष, भाजप**




**पनवेल :** कामगार हितासाठी सातत्याने झटणारे भाजप जिल्हा सरचिटणीस, माजी नगरसेवक नितीन पाटील यांची कामगार चळवळीतल्या अग्रेसर अशा म्युनिसिपल एम्प्लॉईज युनियनच्या सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली. ज्येष्ठ नागरिक संघ पनवेल येथे झालेल्या कंत्राटी कामगारांच्या पहिल्या मेळाव्यात त्यांना नियुक्ती पत्र माजी सभागृह नेते परेश ठाकूर आणि युनियनचे अध्यक्ष सुरेश ठाकूर यांचा हस्ते देण्यात आले. या वेळी म्युन्सिपल एम्प्लॉईज युनियनचे, सरचिटणीस अनिल जाधव, माजी नगरसेवक अजय बहिरा, माजी नगरसेविका हेमलता गोवारी, युनियन कार्याध्यक्ष संतोष पवार, युनियन कोषाध्यक्ष दत्तगुरू म्हात्रे आदी उपस्थित होते.

# उलवेमध्ये लहानग्यांचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उलवे येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये त्यांचा वरिष्ठ केजी गौरव सोहळा आणि आजी-आजोबा दिन मंगळवारी (दि.११) मोठ्या उत्साहात आणि सहभागाने साजरा केला.

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात केली. ज्यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक प्रवासात हा महत्त्वाचा टप्पा गाठल्याबद्दल अभिनंदन केले. भाषणात त्यांनी मुलांच्या कठोर परिश्रम आणि समर्पणाचे कौतुक केले आणि भविष्यात यशासाठी प्रयत्नशील राहण्यास प्रोत्साहित केले. मुलांना या टप्प्यावर पोहचण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या आजी-आजोबांच्या अटळ पाठिंब्याबद्दल




त्यांनी त्यांचे आभार मानले.

या कार्यक्रमाला जेबीएसपी संस्थेचे उपाध्यक्ष वाय.टी. देशमुख, आरटीपीएस उलवेचे अध्यक्ष भार्गव ठाकूर, गव्हाणचे माजी उपसरपंच विजय घरत, जयवंत देशमुख आणि विश्वनाथ कोळी, शाळा समिती सदस्य उपस्थित होते.

आजी-आजोबांनी उत्साही खेळदेखील खेळले, ज्यामुळे कार्यक्रमात मजा आणि सौहार्द वाढला. खेळांचे विजेते सुदर्शन सिंग आणि राजाराम जाधव यांना त्यांच्या उत्साही सहभागाबद्दल बक्षिसे देण्यात आली.

शैक्षणिक वर्षात त्यांच्या उत्कृष्ट योगदान आणि नेतृत्वाबद्दल, मास्टर आदिराज फौजदार यांना स्कूल प्रिन्स आणि मिस मानवी दुबे यांना स्कूल प्रिन्सेसचा किताब देण्यात आला. मुख्याध्यापिका चश्मिंदर बक्षी यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या पुढील शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

# शिक्षकांसाठी पोक्सो कायद्यावर कार्यशाळा

## रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयात शिक्षकांसाठी पोक्सो अर्थात लैंगिक अपराधांपासून बालकांचे संरक्षण कायद्याविषयी कार्यशाळेचे आयोजन मंगळवारी (दि. ११) करण्यात आले होते.

पोक्सो कायदा भारतातील १८ वर्षांखालील मुलांना लैंगिक शोषण व अत्याचारांपासून संरक्षण देण्यासाठी लागू करण्यात आला आहे. आजच्या या कार्यशाळेस प्रमुख वक्ता म्हणून इनरव्हिल क्लब ऑफ नवी मुंबई, सनराईजचे सचिव सारिका प्रकाश या होत्या. त्या एक प्रख्यात वकिल असून बालहक्क विषयातील विशेषत: बाल लैंगिक अत्याचार विषयीच्या सखोल अभ्यासक आहेत. शेरदिल फाऊंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या सदस्य आहेत. त्यांनी या कार्यशाळेत पोक्सो कायद्याचा उद्देश, या कायद्याच्या तरतुदी, शिक्षेचे स्वरुप याबद्दल माहिती दिली. पॉक्सो



कायदयात वेळोवेळी सुधारणा करुन शिक्षेच्या तरतुदी अधिक कठोर केल्या आहेत. २०१९मध्ये बाल लैंगिक अत्याचारासाठी मृत्युदंडाचीही तरतूद करण्यात आली, याबद्दल त्यांनी माहिती दिली. शिक्षण क्षेत्रातील व्यक्तींनी अशा कार्यशाळांमधून माहिती घेतल्यास विद्यार्थ्यांचे संरक्षण अधिक प्रभावीपणे करता येईल, असे मार्गदर्शकांनी सांगितले.

या कार्यशाळेचे आयोजन प्राचार्या निशा नायर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. या कार्यक्रमास इनरव्हिल क्लब च्या अध्यक्षा रचना त्रिवेदी या उपस्थित होत्या. या कार्यशाळेस सर्व शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोत्तर सत्राद्वारे शिक्षकांच्या शंकांचे निरसन करण्यात आले.

# बँकेच्या योजनांबद्दल जागरूकता कार्यक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील वाणिज्य विभागातर्फे पेठगाव व ओवेपेठ गावातील नागरिकांसाठी बँके विषयी जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

या जागरूकता कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील प्रा. राहुल कांबळे तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनींनी पेठगाव व ओवेगाव या दोन्ही गावातील नागरिकांना बँकेमध्ये असलेले वेगवेगळ्या योजना तसेच गुंतवणूक कशी करावी याविषयी मोलाची माहिती दिली. या शैक्षणिक उपक्रमाचा प्रमुख उद्देश दोन्ही गावातील नागरिकांना बँकेच्या वेगवेगळ्या योजना तसेच गुंतवणूक बद्दल माहिती मिळावी हा होता.



हा शैक्षणिक उपक्रम महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या मार्गदर्शनात यशस्वीरित्या घेण्यात आला. या बँकांविषयी जागरूकता कार्यक्रमासाठी वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख प्रा. विशाल देशमुख, प्रा.डॉ. महादेव चव्हाण, प्रा. तनुजा सुमन, प्रा. मनोज यादव, प्रा. प्रमोद वाघे तसेच विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयाचा विद्यार्थिनींसाठी शैक्षणिक उपक्रम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील अकाउंट व फायनान्स विभागातर्फे मंगळवारी (दि.११) रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयातील विद्यार्थिनींसाठी शासनाच्या वेगवेगळ्या योजनांवर सत्राचे आयोजन केले होते.

या सत्रामध्ये अकाउंट व फायनान्स विभागातील प्रा. योगिता पाटील यांनी पेठगाव येथील रामशेठ ठाकूर माध्यमिक विद्यालयात जाऊन तेथील विद्यार्थिनींना शासनाच्या वेगवेगळ्या योजनांची माहिती दिली तसेच त्यांना भविष्यामध्ये त्या योजनांचा फायदा कसा होईल याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले तसेच वेगवेगळ्या योजना




सांगितल्या त्यामध्ये प्रामुख्याने सुकन्या समृद्धी योजना व महिला सक्षम योजना पावर पॉइंट व वेगवेगळी शैक्षणिक साहित्याचा वापर करून विद्यार्थिनींना सविस्तर माहिती दिली.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या शैक्षणिक उपक्रमाचे यशस्वीरित्या आयोजन केल्याबद्दल अकाउंट व फायनान्स विभागातील प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील शैक्षणिक उपक्रमांसाठी शुभेच्छा दिल्या.

या उपक्रमासाठी अकाउंट व फायनान्स विभागाचे विभाग प्रमुख प्रा. प्रवर शर्मा, प्रा. नंदिनी सकपाळ, प्रा. आनंद शेलार तसेच शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी यांनी सहकार्य केले.



**कळंबोली : राज्याचे पाणीपुरवठा गुलाबराव पाटील सोमवारी ब्लॅक स्मिथ सोसायटीच्या पुजेसाठी उपस्थित होते. या वेळी त्यांची आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली भाजप कळंबोली शहर मंडळ कमिटीने भेट घेतली. कळंबोली वसाहतीत सतत खंडित होणारा पाणीपुरवठा लक्षात घेता याबद्दल सिडको प्राधिकरणाला निर्देशित करावे, अशी विनंती कमिटीने मंत्रीमहोदयांकडे केली.**

# लिमये वाचनालयात अष्टपैलू महिलांचा सन्मान



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील के.गो.लिमये सार्वजनिक वाचनालय व ग्रंथालयात 'अष्टपैलू महिलांचा सन्मान' आयोजित करण्यात आला होता.

या वेळी लेखिका प्राध्यापिका पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्या अधिवक्त्या अपर्णा कुलकर्णी-नाडगौंडी, चित्रकार, लेखिका, संगीत विशारद व सामाजिक कार्यकर्त्या पद्मजा कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. दोघींचा परिचय कार्यकारणी सदस्य बी.पी.म्हात्रे, कार्यकारणी सदस्य सुनील खेडेकर यांनी करून दिला.

प्रास्तविक वाचनालयाचे कार्यकारणी सभासद काशिनाथ जाधव यांनी केले. अध्यक्षा अधिवक्त्या सुनिता जोशी यांचा सत्कार कार्यवाहक जयश्री शेटे यांनी केला. ग्रंथपाल निकिता शिंदे सहाययक ग्रंथपाल संपदा जोशी व लिपिक हर्षिता तुरकर यांचा सत्कार अनुक्रमे कार्यकारणी सदस्य रोहिदास पोटे, राजकुमार ताकमोगे व कोषाध्यक्ष प्रकाश पाटील यांनी केला.

सूत्रसंचालन अधिवत्या माधुरी थळकर यांनी केले. कार्यकारणी सदस्या स दीपाली कुलकर्णी यांच्या आभार प्रदर्शनानंतर या कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमासाठी सर्व ग्रंथालयीन कर्मचारी वर्ग तसेच सहाय्यक संजय दिवटे यांचे विशेष सहकार्य लाभले.

# पनवेलमध्ये चार बांगलादेशींना अटक

**पनवेल : वार्ताहर**

रेल्वेस्थानकासमोरील झोपडपट्टीत अनेक दिवसांपासून बांगलादेशी नागरिक बेकायदा वास्तव्य करत असल्याचे उजेडात आले आहे. पनवेल शहर पोलिसांच्या कारवाईत ही माहिती उघड झाली. पोलिसांनी या प्रकरणातील बेकायदा राहणाऱ्या चार बांगलादेशींना अटक केली. यात तीन पुरुष आणि एका महिलेचा समावेश आहे.

नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे यांनी बेकायदा वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशींना पकडण्यासाठी आदेश दिले का आहेत. यामुळे बेकायदा वास्तव्य करणाऱ्यांविरोधात कारवाईसाठी स्थानिक पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनीसुद्धा पोलीस कर्मचार्यांना याबाबत दक्ष राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

पनवेल शहर पोलीस पथक पनवेल रेल्वे स्थानकाच्या प्रवेशद्वारावरील झोपडपट्टीत चौकशीसाठी गेल्यावर त्यांना अब्दुल रशीद अकबर, मोहम्मद नाजमुल हुसेन खाँ, मोहम्मद रजोब अली खाँ आणि ५० वर्षीय नाजमा बेगम रशीद खाँ असे चौघे विना पारपत्र सापडले. हे बांगलादेशातील जाशोर जिल्ह्यातील राहणारे आहेत.

# जलतरण कामगिरीबद्दल तनय लाडचा सत्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्या कामोठे येथे राहणारा बारा वर्षीय पनवेलचा रहिवासी असलेला महाडचा बारा वर्षीय तनय तुषार लाड याने गेटवे ऑफ इंडिया ते अटल सेतू (१७किमी) हे अंतर केवळ २ तास २६ मिनिटांत पार करत सर्वात वेगवान जलतरणपटू होण्याचा मान मिळवला आहे. या अभूतपूर्व जलतरण कामगिरी करून एक नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. या जलतरण कामगिरीबद्दल आयुक्त मंगेश चितळे यांच्या हस्ते सत्कार त्याचा पनवेल पालिका मुख्यालयात सत्कार करण्यात आला.

आई वडिलांच्या मार्गदर्शनाबरोबरच त्याच्या या कामगिरीत प्रशिक्षकांचा मोलाचा सहभाग लाभला आहे. पलावा येथील प्रसिद्ध जलतरणपटू आणि मार्गदर्शक रूपाली रेपाळे व अनिरुद्ध महाडिक यांच्या मार्गदर्शनाखाली तनय प्रशिक्षण घेत आहे. तनयच्या या



विक्रमी कामगिरीमुळे त्याच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत असून त्याच्या कुटुंबीयांबरोबरच प्रशिक्षक, मित्र मंडळी आणि संपूर्ण शाळेतील शिक्षक-विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

तनयने २ मार्च २०२५ रोजी सकाळी ८.४६ वाजता गेटवे ऑफ इंडिया येथून अरबी समुद्रात उडी घेतली आणि भरतीचे लहरी प्रवाह, वाऱ्याचा जोर आणि हवामानाच्या स्थितींशी झुंज देत हा लाटांवरचा खडतर प्रवास ११.१४ वाजता अटल बिहारी वाजपेयी सागरी सेतु येथे पूर्ण केला. त्याने एक नवीन विक्रम प्रस्थापित केला. त्याच्या या अपूर्व यशामुळे तो जलतरण क्षेत्रात एक नवीन प्रेरणादायी उदाहरण बनला आहे.

तनय सध्या न्यू होरायझन पब्लिक स्कूल, पनवेल येथे इयत्ता सहावीत शिक्षण घेत आहे. तसेच याआधी २०२४मध्ये त्याने थायलंडमध्ये ओशियन मॅन स्पर्धेत कांस्यपदक, संकरॉक ते गेटवे, पेरियार कोची केरळ, विजयदुर्ग, रंकाळा कोल्हापूर येथे रौप्यपदक आणि मालवण, पोरबंदर स्पर्धेत सहभाग घेऊन आपल्या जलतरण कौशल्यांचे शानदार प्रदर्शन केले होते. खुल्या समुद्रात स्विमिंग हा अत्यंत कठीण व धाडसी क्रीडा प्रकार आहे.

## संपादकीय

# अतिहस्तक्षेपाचा फटका

अमेरिकन अब्जाधीश उद्योजक इलॉन मस्क यांच्या अमेरिका तसेच युरोपमधील राजकारणातील नको तितक्या हस्तक्षेपामुळे त्यांच्या लोकप्रियतेला मोठा धक्का बसलाच आहे. पण त्यांच्याभोवतीच्या निरनिराळ्या वादांमुळे त्यांचा 'टेस्ला' कार उद्योग तसेच 'एक्स' या समाजमाध्यम मंचालाही फटका बसून सरतेशेवटी जगभरातील सर्वसामान्य 'एक्स' युजर्सना गोंधळाचा सामना करावा लागल्याचे सोमवारी दिसून आले.

**गेल्या आठवडाभरापासून अमेरिकन उद्योजक इलॉन मस्क यांचे नाव इतक्या वादांशी जोडले गेले आहे आणि इतक्या घडामोडी त्यांच्या संदर्भात घडत आहेत की त्या घडामोडींचे परिणाम सरतेशेवटी जगभरातील सर्वसामान्यांपर्यंत येऊन पोहोचले आहेत. अमेरिकेच्या अध्यक्षीय निवडणुकीत डोनाल्ड ट्रम्प यांना सर्वाधिक आर्थिक पाठबळ पुरवणारे व्यक्तिगत देणगीदार म्हणून मस्क यांचा जगभरात गवगवा झाला. त्याही आधीपासून एक्सच्या (पूर्वाश्रमीचे ट्विटर) मालकीमुळे व त्यांच्या टेस्ला कंपनीची विनाड्राइव्हर कार जगभरात कुतुहलाचा विषय ठरल्याने ते जगभरात ओळख कमावून होतेच. पण अलीकडच्या काळात अमेरिकेत ट्रम्प यांची अध्यक्षीय राजवट सुरू झाल्यापासून मस्क चर्चेत आहेत ते त्यांच्या ट्रम्प यांच्याशी असलेल्या अतिजवळीकीमुळे. ट्रम्प प्रशासनात त्यांची ढवळाढवळ बरीच वाढली असून त्यातूनच अनेक मोठ्या निर्णयांशी त्यांचे नाव जोडले गेल्याने अमेरिकेतच नव्हे तर जगभरातही त्यांच्याविषयी विरोधाची भावना वाढते आहे. नुकताच युक्रेनमधील स्टारलिंक सॅटेलाइट इंटरनेट सिस्टमच्या वापराविषयी मस्क यांनी केलेल्या एका विधानावरून वाद निर्माण झाला. स्टारलिंक ही युक्रेनियन सैन्यासाठी सर्वात विश्वासार्ह संप्रेषण प्रणालींपैकी एक आहे. ती ड्रोन चालवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावते. हे तंत्रज्ञान संपूर्ण संरक्षण रेषेवर मोठ्या सैन्यतैनातीची आवश्यकता कमी करून युक्रेनच्या मनुष्यबळाच्या कमतरतेची भरपाई करते. स्टारलिंकचे टर्मिनल्स बंद केले तर युक्रेन कोसळेल असे विधान मस्क यांनी केल्यावरून वाद निर्माण झाला. या सेवेसाठीचा खर्च पोलंडकडून केला जातो. मस्क यांच्या संबंधित विधानाला पोलंडच्या परराष्ट्रमंत्र्यांनी आक्षेप घेतला. या वादात अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांना मस्क यांची बाजू घेणे भाग पडले. तर पोलंडच्या पंतप्रधानांनी आपल्या परराष्ट्र मंत्र्याचे समर्थन केले. वास्तवत: हा अनाठायी वाद टाळता आला असता. मुत्सद्देगिरीचा अर्थच काळजीपूर्वक विवाद टाळणे असा असतो. मस्क यांनी युरोपातील एका मित्रराष्ट्राच्या परराष्ट्र मंत्र्याशी अकारण वाद ओढवून घेतल्याने अमेरिकेच्या परराष्ट्र खात्यातील अधिकाऱ्यांसाठी अकारण समस्या निर्माण झाली. या बेतालपणाची किंमत निव्वळ मस्क यांनाच नव्हे तर अमेरिकेच्या प्रशासनालाही मोजावी लागू शकते. मस्क यांच्यामुळे ट्रम्प अडचणीत येतील का असा प्रश्न त्यामुळेच विचारला जातो आहे. अमेरिकेत अलीकडे सरकारी नोकऱ्यांमध्ये मोठी कपात करण्यात आली. त्याबद्दलही अमेरिकेत मस्क यांच्या विरोधात रोष आहे. जगभरातील देशांतील विविध प्रकल्पांना अमेरिकेकडून 'युएसएड'मार्फत केली जाणारी मदत थांबवण्यामागेही मस्क असल्याचे मानले जाते. अमेरिकेच्या निवडणुकीतील सक्रिय भूमिकेनंतर युरोपातही मस्क यांनी ढवळाढवळ सुरू केल्याने त्यांच्या टेस्ला कार विक्रीला फटका बसल्याचे आता समोर येते आहे. जानेवारी महिन्यात युरोपमध्ये टेस्ला कारच्या विक्रीमध्ये जवळपास निम्म्याने घट झाल्याचे वृत्त आहे. मस्क यांच्या मालकीच्या 'एक्स'वर सोमवारी सायबर हल्ला झाला. याचा फटका जगभरातील युजर्सना बसून मोठा गोंधळ निर्माण झाला. त्यामुळेच मस्क यांच्यासारख्या एका व्यक्तीच्या वादग्रस्त कार्यशैलीचे परिणाम निव्वळ अमेरिकेलाच नव्हे तर जगभरातील लोकांना भोगावे लागू शकतात याची चुणूक दिसली आहे.**


# 'स्पेस-टेक फॉर गुड गव्हर्नन्स'

सुशासन आणि ग्रामविकास हे कोणत्याही राष्ट्राच्या प्रगतीसाठी महत्त्वाचे घटक आहेत. आधुनिक युगात तंत्रज्ञान प्रत्येक क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावत आहे. जिओस्पॅशल तंत्रज्ञानातून आपल्याला अवकाश, भू-स्थानिक आणि भौगोलिक स्थितीची परिपूर्ण माहिती व विश्लेषण उपलब्ध होते, ज्याचा प्रशासन आणि विकासकामांमध्ये उत्तम उपयोग होऊ शकतो.

सुशासन म्हणजे पारदर्शक, उत्तरदायी आणि लोकहिताचे प्रशासन नियोजन, धोरणे ठरविणे आणि योजनांची प्रभावी, जलद व अचूक अंमलबजावणी करण्यासाठी हे तंत्रज्ञान उपयुक्त ठरते. जीपीएस, रिमोट सेन्सिंग आणि जीआयएस यांसारख्या प्रणालीच्या मदतीने गावांची अचूक माहिती मिळते, जी हे आव्हान पेलण्यात उपयुक्त ठरते. जुन्या पद्धतींवर अवलंबून राहिल्यामुळे अनेकदा अयोग्य योजना तयार होतात आणि नैसर्गिक संसाधनांचे व्यवस्थापन चुकते. जिओस्पॅशल तंत्रज्ञान ग्रामपंचायत विकास आराखडा (जीपीडीपी) बनविण्यात अत्यंत प्रभावी ठरू शकते.

गावाच्या नैसर्गिक संसाधनांचे अचूक विश्लेषण करण्यासाठी त्यांची माहिती असणे आवश्यक असते. ही माहिती आज उपग्रहांद्वारे विविध माध्यमांवर उपलब्ध आहे.





त्याआधारे निर्णय घेतल्यास योग्य योजना आखता येतात. जलसंधारण, मृदा संरक्षण, सामाजिक वनीकरण आणि नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापनासाठी या माहितीचा उपयोग होतो. ग्रामपंचायत सदस्य, शेतकरी आणि स्थानिक प्रशासनाला वैज्ञानिक पद्धतींनी नियोजन करण्याची संधी मिळते. तसेच निधी वितरण, योजनांची अंमलबजावणी आणि विकासकामांचा मागोवा घेणे सुलभ होते.

गावाचा विकास हा पाणी, शेती आणि शासन यांवर अवलंबून असतो. अनेक गावांमध्ये पाणीप्रश्न गंभीर आहे. काही वेळा पुरेसा जलसाठा उपलब्ध असूनही व्यवस्थापनाच्या अभावामुळे पाणीटंचाई असते. पावसामुळे जे पाणी मिळते ते बऱ्याच वेळा वाहून जाते. इस्रोने विकसित केलेल्या अनेक संकेतस्थळांवर गावातील जलस्रोतांची माहिती उपलब्ध असते किंवा नसल्यास ती उपलब्ध करता येते. या माहितीच्या आधारे जलव्यवस्थापन आणि संवर्धन करता येते. उदाहरणार्थ, इस्रोच्या भुवन या संकेतस्थळावर मिळणाऱ्या माहितीआधारे जलस्रोत शोधणे व भू-जलस्तर निरीक्षण करता येते. ग्रामविकासासाठी जलव्यवस्थापनेनंतर शेती व्यवस्थापन येते. जमिनीचा प्रकार, मृदा आरोग्य विश्लेषण व पीक पद्धती ठरविण्यात या तंत्रज्ञानाचा वापर उपयोगी पडतो. पर्यावरण संवर्धनासाठी गावातील मोकळ्या जमिनीवर हवामान आधारित वृक्षारोपण, वनसंवर्धन आणि वनधोरणात पारदर्शकता अशा गोष्टींचे योग्य नियोजन करता येते.

गावाच्या विकासासाठी गरजेच्या असणाऱ्या पायाभूत सुविधा आणि त्यांचे नियोजन करण्यासाठी ग्राम मानचित्र संकेतस्थळावरच्या माहितीचा वापर करता येतो. गुगल अर्थ प्रोद्वारे थेट उपग्रह प्रतिमा वापरून योजना तयार करता येतात. भू-नकाशे जमिनीच्या डिजिटल नोंदीसाठी उपयुक्त ठरतात. पीएम-किसान संकेतस्थळ शेतकऱ्यांसाठी अचूक आणि वेळेवर निधीवाटपासाठी उपयुक्त ठरते. नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन करणे हे एक मोठे आव्हान असते. भुवन संकेतस्थळावरील माहिती वापरून आपत्तीपूर्व अंदाजही वर्तवता येतो आणि व्यवस्थापन करणे सोपे जाते. पूर, दुष्काळ आणि हवामान परिस्थितीचे निरीक्षण करता येते. या माहितीस्रोतांचा उपयोग करण्यात आव्हाने तर आहेतच, जसे की तांत्रिक ज्ञानाचा अभाव, भू-सांख्यिकी माहिती व संसाधनांची कमतरता आणि स्थानिक भाषेत माहिती उपलब्ध नसणे; पण प्रशिक्षण शिबिरांतून मोफत व सार्वजनिक माहितीस्रोतांचा वापर आणि भ्रमणध्वनी आधारित जीआयएस ॲप्सचा वापर करायला शिकणे आणि स्थानिक भाषेत संकेतस्थळे विकसित करणे अशा उपाययोजना करून हे अडथळे दूर करता येतील. आपण लोकप्रतिनिधींना निवडून देऊन सरकार चालविण्यासाठी चालकाच्या आसनावर बसवितो; पण त्यांना व प्रशासनाला या कामाचे प्रशिक्षण देणेही गरजेचे असते. रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीने हे ओळखून अनेक विषयांवरील कार्यशाळा आजपर्यंत आयोजित केल्या आहेत.

# मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम

महाराष्ट्र शासनाने राज्याच्या औद्योगिक धोरण-१०१९ अंतर्गत विविध नाविन्यपूर्ण योजना राबवल्या असून, त्यातील एक महत्त्वाची योजना म्हणजे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम. या योजनेद्वारे राज्यातील युवक-युवतींना स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. ग्रामीण आणि शहरी भागात सुक्ष्म आणि लघु उद्योगांची उभारणी होऊन रोजगाराच्या संधी वाढाव्यात, हा हेतू आहे.

योजनेचा उद्देश :- युवक-युवतींमध्ये उद्योजकतेची भावना वाढवणे, ग्रामीण आणि शहरी भागात सूक्ष्म, लघु उद्योगांच्या माध्यमातून रोजगार संधी उपलब्ध करणे, आर्थिक साहाय्य करून स्वतःचा व्यवसाय सुरू करण्यास मदत करणे.

योजनेकरिता पात्रता अटी :- वयोगट १८ ते ४५ वयोगटातील उमेदवार पात्र. विशेष प्रवर्गासाठी (SC/ST/महिला/दिव्यांग/माजी सैनिक/अल्पसंख्याक) वयोमर्यादेत ५ वर्षांची सवलत. शैक्षणिक पात्रता रु. १० लाखांपर्यंतच्या प्रकल्पासाठी किमान ७ वी उत्तीर्ण, रु. २५ लाखांवरील प्रकल्पासाठी किमान १० वी उत्तीर्ण. इतर अटी अर्जदाराने यापूर्वी राज्य किंवा केंद्र शासनाच्या कोणत्याही अनुदानित योजनेचा लाभ घेतलेला नसावा. स्थानिक रहिवासी असणे आवश्यक.

प्रकल्प खर्च मर्यादा : प्रक्रिया व निर्मिती उद्योग: कमाल रु. ५० लाख, सेवा उद्योग: कमाल रु. २० लाख अनुदान आणि आर्थिक मदत: प्रकल्प खर्चाच्या १५ टक्के ते ३५ टक्के पर्यंत अनुदान मिळते. अर्जदाराची स्वतःची गुंतवणूक ५ टक्के ते १० टक्के असणे आवश्यक आहे. आर्थिक मदतीसाठी राष्ट्रीयकृत बँका, खाजगी बँका आणि रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांमार्फत कर्जपुरवठा केला जातो.

योजनेची अंमलबजावणी यंत्रणा : शहरी भाग जिल्हा उद्योग केंद्र. ग्रामीण भाग- जिल्हा खादी व ग्रामोद्योग कार्यालय.

पात्र उद्योग/व्यवसाय: उत्पादन उद्योगसेवा उद्योग-ई-वाहतूक व्यवसाय कृषीपूरक व्यवसाय-कृषीवर आधारित लघुउद्योग, फिरते विक्री केंद्र इ. अर्ज प्रक्रिया: अर्ज पूर्णतः ऑनलाइन असून https://maha-cmegp.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर अर्ज करता येईल. बँकेकडून प्रकल्पास मान्यता मिळाल्यावर आवश्यक कागदपत्रे जमा करावी लागतील.

प्रशिक्षण : उत्पादन उद्योगासाठी २ आठवड्यांचे मोफत निवासी प्रशिक्षणसेवा व कृषीपूरक उद्योगासाठी १ आठवड्यांचे मोफत निवासी प्रशिक्षण.

आवश्यक कागदपत्रे-जन्म दाखला/शाळा सोडल्याचा दाखला, शैक्षणिक प्रमाणपत्रे, आधार कार्ड/पॅन कार्ड, नियोजित उद्योगासाठी जागेचे दस्तऐवज/भाडेकरार, जातीचे प्रमाणपत्र (SC/ST साठी), विशेष प्रवर्गाचे प्रमाणपत्र (अपंग, माजी सैनिक इ.) वाहन व्यवसायासाठी वाहन परवाना, स्वसाक्षांकित वचनपत्र.

**संकलन : जिल्हा माहिती कार्यालय, रायगड-अलिबाग**

## बदलते तंत्रज्ञान

### १०० रुपयांमध्ये जिओचा नवा रिचार्ज प्लॅन लाँच

बहुप्रतिक्षित आयपीएल २०२५ च्या काही दिवस आधी, रिलायन्स जिओने फक्त १०० रुपयांचा आणखी एक रिचार्ज प्लॅन लाँच केला आहे. हा एक नवीन डेटा-



ओन्ली रिचार्ज प्लॅन आहे जो ९० दिवसांचा जिओ हॉटस्टार सबस्क्रिप्शन आणि ५ जीबी डेटा देतो. या पॅकमध्ये फक्त डेटा बेनिफिट्स आहेत आणि सध्या ते गळे.लो वर आहेत. मुकेश अंबानी यांच्या नेतृत्वाखालील कंपनीने जिओ सिनेमा आणि डिस्ने+ हॉटस्टारच्या विलीनीकरणानंतर त्यांच्या सर्व रिचार्ज प्लॅनमधून मूलभूत जिओ सिनेमा बेनिफिट काढून टाकला आहे. दरम्यान आता क्रिकेट चाहत्यांना २२ मार्चपासून सुरू होणाऱ्या आयपीएलच्या १८ व्या सीझन पाहण्यासाठी जिओ हॉटस्टारची सदस्यता घ्यावी लागेल. जिओनं आपल्या ग्राहकांसाठी एक नवीन डेटा पॅक लाँच केला आहे. या पॅकचा उद्देश्य ग्राहकांसाठी फक्त अतिरिक्त डेटा देत नाही तर त्याचबरोबर गळेर्केीीरी चे फ्री सब्सक्रिप्शन देखील देतो. ठशश्रळरपलश गळे ने भारतातील क्रिकेट रसिकांना उद्देशून एक नवीन प्रीपेड रिचार्ज प्लॅन लाँच केला आहे. या सब्सक्रिप्शन सह युजर्स क्रिकेटच्या सीजन मधील सर्व सामने कोणत्याची अतिरिक्त शुल्काविना फक्त रिचार्ज करून पाहू शकतात.

१०० रुपयांचा नवीन प्लॅन-१. पॅकची वैधता - ९० दिवस
२. एकूण डेटा - ५ जीबी
३. हाय स्पीडवर डेटा - ५ जीबी
४. ५ जीबी मर्यादेनंतर, अमर्यादित ६४ केबीपीएस स्पीड

हा बजेट-फ्रेंडली प्लॅन स्मार्टफोन आणि स्मार्ट टीव्हीवर १०८०रिझोल्यूशनपर्यंत (९० दिवसांसाठी) स्ट्रीमिंग करण्याची परवानगी देतो, ज्यामुळे आयपीएल २०२५ चाहत्यांसाठी हा एक उत्तम पर्याय बनतो. हा प्लॅन कोणतेही कॉलिंग किंवा एसएमएस फायदे देत नाही. जिओ हॉटस्टार सबस्क्रिप्शनसह जिओचा डेटा-ओन्ली पॅक सक्रिय करण्यासाठी वापरकर्त्यांना बेस प्लॅनची आवश्यकता असेल. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की हा प्लॅन ॲक्टिव्ह करण्यासाठी ॲक्टिव्ह रिलायन्स जिओ प्रीपेड बेस प्लॅन आवश्यक आहे. बेस प्लॅनशिवाय, फायदे लागू होणार नाहीत. तो प्लॅन व्हॅलिडिटी, डेटा व कॉलिंग बेनेफिट्स सह येणार असावा. बेस प्लॅन शिवाय या नवीन डेटा प्लॅनचा वापर ग्राहकांना करता येणार नाही.

# मराठी नाट्य अभिनेते चित्तरंजन कोल्हटकर

'कोल्हटकर हे नुसतं आडनाव नाही, तर ते एक व्रत आहे. या नावाला यश मिळाले, तर आनंद आहेच. न मिळालं, तर त्याचं दुःख वाटू द्यायचं नाही, तर ते 'व्रत चालूच ठेवायचं!' हा जीवनसंदेश आपल्या चिरंजीवांना देणारे आहेत (कै.) नटवर्य चिंतामणराव गणेश कोल्हटकर आणि तो संदेश प्राणपणाने जपणारे चिरंजीव आहेत (कै.) नटवर्य चित्तरंजन चिंतामणराव कोल्हटकर. पिता-पुत्र दोघेही रंगदेवतेचे निष्ठावान उपासक!



चित्तरंजन चिंतामणराव कोल्हटकर यांचा आज स्मृतिदिन. चित्तरंजन कोल्हटकर हे मराठी नाट्य अभिनेते, चित्रपट अभिनेते होते. त्यांचा जन्म १५ जानेवारी १९२३ रोजी महाराष्ट्रात अमरावती येथे झाला. त्यांचे वडील चिंतामणराव कोल्हटकर हेसुद्धा नाटकांतून अभिनय करत असत. विनोदी साहित्याचे मेरूमणी श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हे चित्तरंजन कोल्हटकर यांचे चुलते. 'भावबंधन' नाटकातील 'मोरेश्वर' या भूमिकेतून ४ फेब्रुवारी १९४४ रोजी कोल्हटकरांचे नाट्यक्षेत्रात पदार्पण झाले.

१५ जानेवारी १९२३ रोजी अमरावती येथे चित्तरंजन यांचा जन्म झाला. वडील चिंतामणराव हे बलवंत संगीत मंडळीचे मालक, चालक, पालक. उत्कृष्ट गद्यनट आणि उत्तम नाट्यशिक्षक. राम गणेश गडकरी

**निमित्त**

या त्या काळच्या प्रख्यात नाटककारांचे अत्यंत जिव्हाळ्याचे मित्र. बलवंतचा 'मुक्काम सतत फिरता असायचा. त्यामुळे चित्तरंजन यांचे शिक्षण अमरावती, सांगलीचे बालशिक्षण मंदिर, सिटी हायस्कूल सांगली, राष्ट्रीय शाळा खामगाव अशा विविध ठिकाणी झाले. पुढे परिस्थितीमुळे त्यांना शिक्षण अर्धवट सोडून पोटाची खळगी भरण्यासाठी वणवण करावी लागली. वास्तविक आपल्या मुलाने या नाट्यव्यवसायात यावे, असे चिंतामणरावांना मुळीच वाटत नव्हते. त्याने बॅरिस्टर व्हावे, अशीच त्यांची इच्छा होती; म्हणून तर त्यांनी आपल्या पहिल्या अपत्याचे नाव चित्तरंजन असे ठेवले. समोर आदर्श होता बंगालचे बॅरिस्टर चित्तरंजनदास यांचा; पण नियतीच्या मनात काही वेगळेच गणित होते.

तत्पूर्वी १९४७ मध्येच भालजी पेंढारकरांच्या 'गरिबांचे राज्य' या चित्रपटाद्वारे त्यांनी चित्रपटक्षेत्रात प्रवेश केला. १९५० मध्ये झळकलेल्या 'कुंकवाचा धनी' या चित्रपटात त्यांना नायकाची व्यक्तिरेखा साकारायची संधी सर्वप्रथम लाभली. त्यांनी शांताबाई आपटे यांच्याबरोबर नायकाची भूमिका केली. त्यानंतर 'पेडगांवचे शहाणे', 'शेवग्याच्या शेंगा', 'मोहित्याची मंजुळा', 'हिरवा चुडा', 'थांब लक्ष्मी कुंकू लावते', 'जावई माझा भला', 'तू तिथे मी' आदी ८० पेक्षा जास्त चित्रपटांतून त्यांनी भूमिका केल्या. अभिनयाशिवाय कोल्हटकरांनी नाटकांचे दिग्दर्शनही केले.

१९६४ मध्ये 'मोहिनी' हे त्यांनी दिग्दर्शिलेले पहिले नाटक होते. १९४९ मध्ये जेव्हा त्यांनी पहिल्यांदा 'भावबंधन' केले, तेव्हा लता मंगेशकरही त्या नाटकात होत्या. 'आग्र्याहून सुटका', 'बेबंदशाही', 'पद्मिनी', 'इथे ओशाळला मृत्यू', 'नटसम्राट' आदी प्रसिद्ध मराठी नाटकांतून त्यांनी अजरामर भूमिका केल्या.अशा या थोर अभिनेत्याचे २५ ऑक्टोबर २००९ रोजी निधन झाले.

## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

### 'व्हिटॅमिन पॅचेस' नेमके काय आहेत?

पारंपरिक पूरक आहारांसाठी व्हिटॅमिन पॅचेस एक लोकप्रिय पर्याय बनत आहेत, जे तुमच्या पोषक घटकांची पातळी वाढवण्याचा एक सोपा, वेदनारहित मार्ग असल्याचे आश्वासन देतात. हे पॅचेस त्वचेद्वारे थेट रक्तप्रवाहात जीवनसत्त्वे आणि खनिजे पोहोचवण्याचा दावा करतात.



'व्हिटॅमिन पॅचेस' कसे काम करतात?

सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञ डॉ. जगदीश हिरेमठ यांनी सांगितले की, व्हिटॅमिन पॅचेस ट्रान्सडर्मल डिलिव्हरी सिस्टीम वापरतात, ज्याची रचना जीवनसत्त्वे आणि पोषक घटक त्वचेद्वारे थेट रक्तप्रवाहात सोडण्यासाठी केली जाते. हे व्हिटॅमिन पॅचेस सामान्यतः चिकट असतात आणि त्यात नियंत्रित प्रमाणात पोषक घटक असतात, जे हळूहळू शोषले जातात.

जीवनसत्त्वे त्वचेच्या बाह्य थरातून जातात आणि केशिकांमार्फत रक्तप्रवाहात पसरतात. तोंडावाटे घेतलेल्या ओरल सप्लिमेंट्सच्या विपरीत, ज्यांना गॅस्ट्रोइंटेस्टायनल ट्रॅक्ट आणि यकृत (फर्स्ट-पास मेटाबोलिझम)मधून जावे लागते. व्हिटॅमिन पॅचेस थेट रक्तप्रवाहात पोषक घटक पोहोचवण्याचे उद्दिष्ट ठेवतात.

व्हिटॅमिन पॅचेसचे फायदे खालीलप्रमाणे् :

गोळ्या गिळण्याची किंवा डोस शेड्युल्स मॅनेज करण्याची आवश्यकता नाही.

पचनाच्या समस्या असलेल्या व्यक्तींसाठी क्रोहन रोग किंवा गॅस्ट्रिक बायपास रुग्णांसारख्या खराब शोषण स्थिती असलेल्या लोकांसाठी योग्य.काही तासांत पोषक तत्वांचे नियंत्रित प्रकाशन प्रदान करते, ज्यामुळे पोषक तत्वांच्या पातळीत वाढ आणि घट कमी होते.

तथापि, त्वचेद्वारे केले जाणारे शोषण अत्यंत निवडक आणि मर्यादित प्रमाणात असते.

कारण- त्वचेमधून सर्व जीवनसत्त्वे प्रभावीपणे आत प्रवेश करू शकत नाहीत, ज्यामुळे ही पद्धत कमी विश्वासार्ह ठरते, इतरांपेक्षा त्वचेद्वारे अधिक प्रभावीपणे शोषली जाणारी विशिष्ट जीवनसत्त्वे किंवा पोषक घटकव्हिटॅमिन डीसारखी जीवनसत्त्वे सूर्यप्रकाशाद्वारे त्वचेमध्ये नैसर्गिक संश्लेषणामुळे ट्रान्सडर्मल शोषणासाठी अत्यंत प्रभावी आहेत. सायनोकोबालामिन आणि मिथाइलकोबालामिन यांसारख्या लहान रेणूंसह व्हिटॅमिन बी१२ त्वचेत प्रवेश करू शकते.

# विद्यार्थीदशेत शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्या व आपली स्वप्ने पूर्ण करा

## पोलीस उपनिरीक्षक शिल्पा वेंगुर्लेकर यांचे पेण जोहेत प्रतिपादन

**पेण : प्रतिनिधी**

विद्यार्थीदशेत शिक्षणाला सर्वोच्च प्राधान्य द्या व आपली स्वप्ने पूर्ण करा असा संदेश पेण पोलीस ठाण्याच्या महिला पोलीस उपनिरीक्षक शिल्पा वेंगुर्लेकर यांनी विद्यार्थ्यांना दिला. पेण तालुक्यातील श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित न्यू इंग्लिश स्कूल व ज्यु. कॉलेज, जोहे येथे जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून पेण महिला पोलीस उपनिरीक्षक शिल्पा वेंगुर्लेकर आणि महिला पोलीस हवालदार सुषमा भोईर या उपस्थित होत्या. यावेळी त्या बोलत होत्या.



विद्यार्थिनींना महिलाशक्तीचा जागर करत त्यांच्या उज्वल भविष्यासाठी प्रेरणा दिली. तसेच, सोशल मीडियाच्या दुष्परिणामांबाबत सावधगिरी बाळगण्याचे महत्त्व त्यांनी यावेळी पटवून दिले.

यावेळी विद्यालयातील सर्व महिला शिक्षक भगिनींचा सन्मान वेंगुर्लेकर मॅडम यांच्या हस्ते करण्यात आला. महिला शिक्षिका बच्छाव मॅडम यांनी जागतिक महिला दिनाचे महत्त्व विशद केले, तर प्राचार्य गलांडे सर यांनीही विद्यार्थिनींना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या.

विद्यार्थ्यांनी या निमित्ताने स्त्रीशक्तीवर भाषणे सादर केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पन्हाळकर यांनी केले, प्रास्ताविक रेश्मा पाटील यांनी केले, तर शेवटी आभार प्रदर्शन शिंदे यांनी केले.

---

## जाहिर निविदा

सर्व अधिकृत ठेकेदार यांस कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे कामासाठी सिलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. तरी अधिकृत ठेकेदारांच्या दिनांक ०९/०३/२०२५ ते १४/०३/२०२५ रोजी संध्याकाळी ६.०० वाजेपर्यंत निविदा स्विकारल्या जातील. कोणतीही निविदा मंजूर करणे अगर नाकारणेचा अधिकार प्रगती हाईटस सोसायटीच्या कमिटीकडे राखून ठेवला आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १ | प्रगती हाईटस सोसायटीसाठी पत्रा शेड बनविणे. (७५०० स्के.फुट) | ८०००००/- |

दिनांक ०९/०३/२०२५

सही/- चेअरमन  सही/- सेक्रेटरी

**प्रगती हाईटस को-ऑप.हौ.सोसा. लि.**

प्लॉट नं. ८२ ते ८६, सेक्टर- ३४, कामोठे, ता. पनवेल, जि. रायगड

---

## खालापूर नगरपंचायत

मु.पो.ता.खालापूर ,जि.रायगड
स्थापना – २६ जून २०१५
दुरध्वनी क्र.०२१९२-२७५०१५ पिन नं.४१०२०२
ई- मेल आयडीcokmckhalapur@gmail.com

नपंखा/लोकसेवा हक्क /११३७/२०२४-२०२५  दि. १२/०३/२०२५

**जाहीर सूचना**

खालापूर शहरातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, खालापूर नगर पंचायतीने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ अंतर्गत एकूण ६३ लोकसेवा अधिसूचित केलेल्या असून, त्याअंतर्गत अधिसूचित लोकसेवांचे पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांच्याबाबत सविस्तर माहिती शासन राजपत्रात पाहता येईल.

शासन राजपत्राचा दुवा खालीलप्रमाणे आहे.

https://mahaulb.in/PortalSite/#/app/home

दिनांक :- १२/०३/२०२५
ठिकाण :- खालापूर

स्वा/-
(वैभव गारवे)
मुख्याधिकारी,
खालापूर नगर पंचायत

---

# मुरूड शहरात अस्वच्छता; कचरा रस्त्यात टाकणाऱ्यांवर कारवाईची मागणी

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड -जंजिरा नगरपरिषद तर्फे बाजारपेठकरिता घरातील व दुकानातील कचरा घेण्यासाठी घंटागाडी दिवसातून दोनदा येते. तरी ही काही भाजी विक्रेते त्या कचरा घंटागाडीत कचरा न टाकता रात्रीच्या वेळी दुकानाच्या समोरच नाश्ता भाजी व फळे फेकून देतात



यामुळे या ठिकाणी उनाड बैले येऊन टाकलेला कचरा खाऊन पसरवत असल्याने या दुर्गधीला स्थानिक नागरिकांना सामोरे जावे लागते. रोज कचरा टाकत असल्याने उनाड बैलांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.रस्तावर कधी कधी या बैलामध्ये तुंबळ हाणामारी होते यात काही नागरिक जखमी ही झाले आहेत. तरी या विक्रेत्यांवर नगरपरिषदेच्या स्वच्छता विभागाने कारवाई करावी अशी मागणी नागरिक करीत आहेत.

---

## कुळगांव बदलापूर नगरपरिषद

नवीन प्रशासकीय ईमारत, म. गांधी चौक रोड,
बदलापूर रेल्वे स्टेशन (पूर्व), कुळगांव, पिन ४२१५०३, ता. अंबरनाथ जि. ठाणे.
ई-मेल: coud.kulgaonbadalapurmaharashtra.gov.in, वेबसाइट :- kbmc.gov.in.

**जा.क्र. : कुबनप/ई-गव्ह/१४९/२०२४-२५  दिनांक :- ११/०३/२०२५**

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेचे कामकाज हे महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती, व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ तसेच राज्यशासन व केंद्र शासनाकडील विविध शासन निर्णय, आदेश यानुसार करण्यात येते. कुबनपच्या https://kbmc.gov.in/ या वेबसाईटचे डोमेन व क्लाऊड स्पेस नूतनीकरण तसेच देखभाल दुरुस्ती करणेकरिता महाराष्ट्र शासनाकडील योग्य त्या नोंदणीकृत कंत्राटदाराकडून दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर दरपत्रक स्विकृतीचा कालावधी दि. १२/०३/२०२५ ते दि. १९/०३/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत असून तसेच सदरची निविदा दि.२०/०३/२०२५ रोजी दुपारी तीन वाजल्यानंतर उघडण्यात येतील.

सही/-
मुख्याधिकारी
कुळगाव बदलापूर नगरपरिषद

---

## MAHATRANSCO — e- TENDER NOTICE

Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website https://srmetender.mahatransco.in/ for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission date |
|---|---|---|---|---|
| 1. | e-Tender-09/25-26 /7000035687 | Providing 23 No of Skilled labour (ITI certified Technicians in Electrical / Wireman trade) for field work under 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane for F.Y. 2025-26 | Rs 81,53,153/- | 23.03.2025 up to 23:59 hrs |
| 2. | e-Tender-10/25-26 /7000035688 | Work of Providing 2 no of skilled labour (LDC cum computer operator) & 2 no unskilled labour (peon) at 400kV R.S. (O&M) Dn., Nagothane for 2025-26 | Rs 13,08,742/- | 23.03.2025 up to 23:59 hrs |

EMD fee 1% of estimate amount & Tender fee Rs. 500/- + GST For further details visit our website https://srmetender.mahatransco.in/ Contact Person: MITESH GOYAL Mob No. 9461456635 Email ID: ee7230@mahatransco.in Note: All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

Sd/-
EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane

---

# खालापूर तालुक्यातील शिक्षकांचा सन्मान

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा येथील बिर्ला कार्बन इंडिया प्रा. ली. व पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमानाने जागतिक महिला दिनानिमित्त मॉनटेरिया विलेज चौक येथे खालापूर तालुक्यातील प्राथमिक शाळा संघ खालापूर येथील शिक्षक शिक्षिका यांचा सत्कार सन्मानाचा कार्यक्रम उत्साहात झाला.

या वेळी कॅन्सर जनजागृती अभियान शिबिर ठेवण्यात आले होते. त्यासाठी टाटा मेमोरियल सेंटर मुंबई कर्करोग प्रतिबंध विभाग खोपोली येथील डॉक्टरांनी मार्गदर्शन केले. या वेळी अरुण गोविंद जाधव अध्यक्ष पाताळगंगा नदी आणि पर्यावरण संवर्धन चॅरिटेबल ट्रस्ट, उमेश विचारे टाटा मेमोरियल सेंटरचे डॉक्टर व खालापूर तालुक्यातील शिक्षक शिक्षिका बहुसंख्येने उपस्थित होते.



---

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की आमचे अशिलांनी मौजे - मोरारे ता. पनवेल जि. रायगड येथील खालील वर्णन केलेली मिळकत कायम स्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**जमिनीचे वर्णन**
**मौजे मोसारे, ता. पनवेल, जि. रायगड**

| मौजे | जमिन भोगवटादाराचे नाव | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|---|---|
| मोसारे | दिलीप बाबूराव भोईर | १४ | १ | ०-३१-६०<br>०-०३-०० | ७.१२ |
| | | | | एकूण- ०-३४-६० | |

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, अन्नवस्त्र, पोटगी, इजमेंट, वारसाहक्क, हुकूमनामा वगैरे असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हयाची नोंद घ्यावी.

ता. ११/०३/२०२५
पनवेल

सही/-
**ॲड. प्रधान मधूकर पाटील**

ऑफिस नं १३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि.रायगड
मोबाईल. ९३२४३७५५०२

---

## MAHATRANSCO — E.H.V. Civil Const. cum Maint. Division, Panvel
## SRM e-Tender Notice No. 01/2025-26

Online bids (SRM e-Tenders) are invited for following works from the registered contractors. :

| SRM e-Tender No. | RFx no. | Name of work | Estimated cost in Rs. |
|---|---|---|---|
| 01/ 2025-26 | 7000035668 | Providing services of 7 nos of Multi Tasking Skilled labour at EHV CCCM DN Panvel, EHV CCCM Sub-Dn Panvel, Kharghar, Kalyan at EHV CCCM Dn Panvel for FY 2025-2026.(01.04.2025 to 31.03.2026) | 26,37,254.76/- |

For detailed information, please see SRM e-Tender section of our website: www.mahatransco.in. Contact person: Shri. Ravi D. Patil, Dy. EE(Civil) Mobile No. 9765644291 & Shri. Rushikesh A.Jadhav, Head Clerk, Mobile No. 9769130569, EHV CCCM Division, Panvel.

Sd/-
Executive Engineer (Civil), EHV CCCM Division, Panvel

---

## MAHATRANSCO — SRM E-TENDER NOTICE (SECOND CALL)

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender-44 /IInd Call/ 2024-25 Dtd.12.03.2025 RFX No. 7000034769 | **Sub:-** Second Call for SRM E-tender for the work of measurement of tower footing impedance of 220kV & 100kV lines under Line maintenance Sub Division Mahad under EHV (O&M) Division Mahad | Rs. 3,54,265/- (including GST + 1% Labour CESS). |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.

Bid submission is from 12.03.2025 @ 00:00 hrs to 21.03.2025 @23:59Hrs for above tender For further details visit our website:-https://srmetender.mahatransco.in.

**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

-Sd/-
Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad

---

# रूद्रवली शाळेत जागतिक महिला दिन

**माणगाव : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनानिमित्त रा.जि.प.शाळा रुद्रवली येथे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थी भाषणानंतर कार्यक्रमात सहभागी सर्व माता पालकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असलेले तळाशेत केंद्राचे केंद्रप्रमुख गणेश ढेपे यांनी उपस्थितांना महिला दिनाचे महत्त्व सांगितले. कार्यक्रमांचे सूत्रसंचालन प्राजित पवार यांनी केले तर अमोल गुरव यांनी उपस्थितांचे आभार मानले.



---

महाराष्ट्र शासन, गृह विभाग (बंदरे व परिवहन)

## महाराष्ट्र सागरी मंडळ

इंडियन मर्कन्टाईल चेंबर्स, दुसरा मजला, १४ रामजीभाई कमानी मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई- ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६९०४१७७७ फॅक्स क्र. ०२२-६९०४१७४०
Website: https://mahammb maharashtra.gov.in
Email: ceo.mmb@maharashtra.gov.in/ceommb@gmail.com

**ई - निविदा सूचना (सन २०२४-२५) ५३/१०/८९/९१/७३/५१/७२**

Main Portal: https://mahatenders.gov.in

मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई यांचे मार्फत योग्य अनुभव असलेल्या ठेकेदाराकडून खाली नमूद केलेल्या कामासाठी बी-१ नमुन्यात ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाच्या निविदेची अंदाजित किंमत (रु.) | इसारा रक्कम (रु.) | को-या निविदेची किंमत (रु.) | काम पूर्ण करण्याचा कालावधी (महिन्यात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | मांडवा जेट्टी ता. अलिबाग जि. रायगड येथील जेट्टी परिसरात सीसीटीव्ही प्रणाली बसविणे. | १२,९१,३६४/- | १३,०००/- | ५९०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी वळगून) |
| २ | करंजा प्रवासी जेट्टी येथे प्रवासी शेड बांधणे, ता. उरण जि. रायगड. | १६,४६,०२६/- | १६,५००/- | ५९०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ३ | ग्रामपंचायत वशेणी बंदराकडे जाणारा रस्ता काँक्रीटीकरण करणे, ता. उरण जि. रायगड. | १७,०४,६५५/- | १७,५००/- | ५९०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी वळगून) |
| ४ | ग्रामपंचायत वढाव अंतर्गत कान्होबा येथे जेट्टी व निवारा शेड बांधणे, ता. पेण जि. रायगड. | २३,९०,८७२/- | २४,०००/- | ५९०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी वळगून) |
| ५ | ग्रामपंचायत विधणे हद्दीतील मौजे बोरखार येथील जेट्टी मजबुतीकरण करणे, ता. उरण जि. रायगड. | ३४,४३,२७०/- | ३४,५००/- | ५९०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी धरून) |
| ६ | ग्रामपंचायत रावे अंतर्गत रावे कोपर येथे जेट्टी व प्रवासी निवारा शेड बांधणे, ता. पेण जि. रायगड. | ३६,७७,७०८/- | ३७,०००/- | ५९०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी वळगून) |
| ७ | ग्रामपंचायत वाशी अंतर्गत ओढांगी ता. पेण जि. रायगड येथे जेट्टी व निवारा शेड बांधणे. | ४२,०२,८५३/- | ४२,५००/- | ५९०/- | ०९ महिने (पावसाळा कालावधी वळगून) |

तपशिलवार अटी व शर्ती पाहण्यासाठी तसेच कोरा निविदा फॉर्म डाऊनलोड करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या ई-निविदा पोर्टल https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १३.०३.२०२५ रोजी १५:०० वा. पासुन ते २०.०३.२०२५ रोजी १७.०० पर्यंत उपलब्ध असतील.

कोणतीही निविदा किंवा सर्व निविदा कारण न दर्शविता नाकारण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीकार यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

**टिप :- उपरोक्त कामांपैकी अनु.क्र. ०२ चे काम द्वितीय निविदेकरीता मागविण्यात येत आहे.**

सही/-
(सुधीर देवरे)
कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र सागरी मंडळ, मुंबई.

आरओसी-२०२४-२५/क्र-५/C७०१७

---

## MAHATRANSCO — SRM E-TENDER NOTICE

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O&M)/DIVN/ MHD/ Tech/E-Tender-05 / 2025-26 Dt.12.03.2025 **RFX No. 7000035713** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type ( i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type etc) services along with fuel and driver at Line Maintenance Sub Division Mahad under EHV (O&M) Division Mahad For the year 2025-26. | **Rs. 5,72,581/- (including GST)** |
| 2. | **Tender No:-** EE/EHV (O & M ) /DIVN/MHD/ Tech/E-Tender -06 /2024-25 Dtd.12.03.2024 **RFx No.7000035714** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type ( i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type etc) services along with fuel and driver at Substation Maintenance Sub Division Mangaon under EHV (O&M) Division Mahad For the year 2025-26 | **Rs.5,73,361/- (including GST)** |
| 3. | **Tender No:-** EE/EHV (O & M ) /DIVN/MHD/ Tech/E-Tender -07 / 2024-25 Dtd.12.03.2024 **RFx No.7000035715** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV Jeep Type ( i.e. Mahindra Xylo, Mahindra Bolero, Mahindra TUV, TATA Sumo Gold or similar type etc) services along with fuel and driver at 220 kV Kandalgaon Substation under EHV (O&M) Division Mahad For the year 2025-26. | **Rs.5,71,404/- (including GST)** |
| 4. | **Tender No:-** EE/EHV (O & M ) /DIVN/ MHD/ Tech/E-Tender -08/ 2024-25 Dtd.12.03.2024 **RFx No.7000035720** | **Sub:-** Invitation of SRM E-Tender for hiring of LMV (e.g. Hyundai Xcent, Maruti Dzire, Maruti Brezza, Maruti Ertiga or similar Type) services along with fuel and driver at EHV (O&M) Dn. Mahad for the year 2025-26. | **Rs.5,29,442/- (including GST)** |

EMD will be the 1% of the estimated cost or whichever is the highest & tender fee will be the 500/-plus GST. Bid submission is from 12.03.2025 @ 00:00 hrs to 26.03.2025 @23:59Hrs for above tender for further details visit our website:- https://srmetender.mahatransco.in

**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089

Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

-Sd/-
Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad

# नवी मुंबई, खारघर आंतरराष्ट्रीय दर्जाचे होणार -ना. गणेश नाईक

**नवी मुंबई : बातमीदार**

राज्याच्या अर्थसंकल्प हा महाराष्ट्राची विकासाची गती वाढविणारा आहे. अर्थसंकल्पात ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उन्नत मार्ग आणि नवी मुंबई व खारघर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाची व्यापर केंद्रे निर्माण करण्याची घोषणेमुळे नवी मुंबई हे आंतरराष्ट्रीय शहर होण्यास मदत होणार असल्याची प्रतिक्रिया राज्याचे वनमंत्री गणेश नाईक यांनी राज्याच्या अर्थसंकल्पावर व्यक्त केली.

राज्याच्या अर्थसंकल्पातील पायाभूत सुविधांवर भर, शेती क्षेत्रातील कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर आणि सामाजिक कल्याणाच्या योजनांच्या तरतुदीमुळे राज्याचा विकासाची गती आणखी वेगाने वाढणार आहे. महामुंबई हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे ग्रोथ हब करण्याच्या घोषणेचा फायदा नवी मुंबई व खारघरला होणार आहे. त्याचबरोबर पालघर जिल्ह्यातील वाढवण बंदर आणि त्याच्या जवळील प्रस्तावित तिसऱ्या विमानतळामुळे व समृद्धी महामार्गाला जोडले जाणार असल्यामुळे पालघर परिसराचा विकास गतीने होणार आहे. पायाभूत सुविधांवर भर दिल्यामुळे राज्यात बंदरे, विमानतळांच्या विकासासाठीही मोठी गुंतवणूक येण्यास मदत होणार असल्याचा विश्वास वने मंत्री नाईक यांनी या वेळी व्यक्त केला.

लाडकी बहिण योजना, लखपती दिदी योजनामुळे राज्यातील लाडक्या बहिणी आत्मनिर्भर व स्वयंपूर्ण होण्यास मदत होणार आहे. शेती, शिक्षण, सिंचन, महिला, आरोग्य, पायाभूत सुविधा, शिक्षण, मनुष्यबळ विकास, दळणवळण, पर्यटन, सांस्कृतिक आणि उद्योग या सर्वच क्षेत्रासाठी भरीव तरतूदीमुळे हा अर्थसंकल्प सर्वसमावेशक व सामाजिक न्यायाचे तत्व पाळणारा असल्याचेही नाईक यांनी या वेळी सांगितले.



**कळंबोली : येथील प्रवीण सुभाष जगताप यांची दिल्लीत होणाऱ्या पॅरा पॉवरलिफ्टिंग राष्ट्रीय खेळासाठी पनवेल तालुक्यातुन निवड झाली आहे. या खेळासाठी त्यांना दिल्लीमध्ये जाण्यासाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी जगताप यांना आर्थिक सहाय्य केले आहे. ही मदत भाजपचे कळंबोली अध्यक्ष रविनाथ पाटील यांच्या हस्ते जगताप यांना देण्यात आली. या वेळी सरचिटणीस दिलीप बिष्ट, चित्तरंजन शेट्टी, केशव यादव, राजेश पांडे आदी उपस्थित होते.**

# 'नैना'मधील नगररचना परियोजना ८ ते १२च्या लवाद सुनावणीस प्रारंभ

## भूधारकांनी संपर्क साधण्याचे सिडकोचे आवाहन

**नवी मुंबई : सिडको वृत्तसेवा**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रभाव अधिसूचित क्षेत्र (नैना) अंतर्गत नियोजित आणि शाश्वत शहरी विकासाला चालना देण्यासाठी नगररचना परियोजना हा प्रमुख विकास प्रारुप म्हणून स्वीकारण्यात आला आहे. सध्या नैना क्षेत्रात एकूण १२ नगररचना परियोजना प्रस्तावित असून त्यापैकी परियोजना १ आणि २ या अंतिम मंजुरी प्राप्त झालेल्या आहेत, तर परियोजना ३ ते ७ यांना प्राथमिक मान्यता मिळाली आहे. नगररचना परियोजना ८, ९, १०, ११ आणि १२ यासाठी लवाद सुनावणीस प्रारंभ झाला असून संबंधित भूधारकांनी या प्रक्रियेत सहभाग घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात येत आहे.




या संदर्भात सिडकोने प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, नैना क्षेत्रातील नियोजित पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत. या प्रक्रियेस गती देण्यासाठी नगररचना परियोजना ८, ९, १०, ११ आणि १२ अंतर्गत भूखंड अंतिमिकरण व लवाद सुनावणी कार्यवाही सुरू झाली आहे. या सुनावणी प्रक्रियेमध्ये भूधारकांचे म्हणणे विचारात घेऊन त्यांचे हित जोपासण्यास प्राधान्य दिले जाणार आहे. या संदर्भात लवाद सुनावणीमध्ये भूधारकांनी त्यांचे म्हणणे सादर करावे, जेणेकरून विकास प्रक्रियेत पारदर्शकता आणि समावेशकता सुनिश्चित करता येईल. नगररचना परियोजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आणि भूधारकांचा सहभाग सुनिश्चित करण्यासाठी सिडकोकडून व्यापक जनजागृती मोहीमदेखील राबवली जात आहे.

नैना क्षेत्राच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच पायाभूत सुविधा आणि नागरी सुविधांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सुधारणा शुल्क/बेटरमेन्ट चार्जेस संदर्भात महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले असून, त्याच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक पुढील प्रक्रिया सुरु आहे. नगररचना परियोजना ८, ९, १०, ११ आणि १२ अंतर्गत भूधारकांसाठी नैना लवाद कार्यालय, बेलापूर रेल्वे स्थानक संकुल, ७ वा मजला, टावर नं १०, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे कार्यरत असून संबंधित भूधारकांनी या ठिकाणी आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे. अधिक माहितीसाठी संबंधित विभागाशी संपर्क साधावा, असे सिडकोतर्फे सूचित करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे ज्या भूधारकांना त्यांच्या वाटप झालेल्या भूखंडांबाबत आक्षेप आहेत त्यांनी लवाद सुनावणीदरम्यान आपली भूमिका मांडावी.

सिडकोने यासाठी आवश्यक ती प्रक्रिया पारदर्शक ठेवली असून भूधारकांच्या आक्षेपांचे निराकरण योग्य रीतीने केले जाणार आहे तसेच मसुदा आराखड्यात वाटप करण्यात आलेल्या अंतिम भूखंडांच्या मालकीबाबत संबंधित भूधारकांना स्पष्टता मिळावी यासाठी लवाद सुनावणी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. त्यामुळे संबंधित सर्व भूधारकांनी आपली कागदपत्रे तपासून आवश्यक त्या बाबींची पूर्तता करून लवाद प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन सिडकोतर्फे करण्यात आले आहे.

# पनवेल तालुका प्रेस क्लबतर्फे कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून रायगड प्रेस क्लब संलग्न पनवेल तालुका प्रेस क्लब तर्फे विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात करण्यात आला.



या वेळी पनवेलचे महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, तहसीलदार विजय पाटील, अतिरिक्त आयुक्त कैलास गावडे, पिल्लई कॉलेजच्या निवेदिता श्रेयन्स आणि पनवेल प्रेस क्लबचे अध्यक्ष प्रशांत शेडगे या वेळी उपस्थित होते. या वेळी बोलताना आयुक्त मंगेश चितळे यांनी सांगितले की, देशाचे पंतप्रधान यांनी सांगितले की, महिला सुरक्षा ही प्राथमिकता असून पनवेल महापालिकादेखील त्या अनुषंगाने महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने पालिकेमार्फत बनविण्यात येणाऱ्या ॲपमध्ये महिलांसाठी निर्भया हेल्पलाईनचा समावेश करण्यात आला असल्याची माहिती दिली.

या वेळी विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. यामध्ये निवेदिता श्रेयन्स (पिल्लई कॉलेज), गीतांजली पाटील (अग्नीशमन दल, पनवेल), स्मिता जोशी (उद्योजिका, वीणा वर्ल्ड), स्वप्नाली चौधरी (पनवेल महानगरपालिका), आरती रेवसकर (मंडळ अधिकारी, कळंबोली), ॲड.सुचिता पाटील (वकील, पनवेल), वर्षा कुलकर्णी (जनसंपर्क अधिकारी, पनवेल महानगरपालिका), साधना पवार (पनवेल शहर पोलीस स्टेशन), शिला सांगळे (सायबर पोलीस स्टेशन, नवी मुंबई), तृप्ती पालकर (पत्रकार), रोहिणी कुरंदेकर (उद्योजिका, रोहिणी कॅटरर्स), चित्रलेखा जाधव (शिक्षिका, उसर्ली, पनवेल), रुपाली हिर्लेकर (निवेदिका), श्वेता कुमार (मिडीया सेल) यांचा सत्कार करण्यात आला.

या वेळी प्रेस क्लबचे दत्तात्रय कुलकर्णी, तृप्ती पालकर, राकेश पितळे, स्वप्नील दुधारे, सुमंत नलावडे, अनिल भोळे, संजय कदम, गणेश कोळी, सचिन भोळे, सन्नी पांडे, प्रतिक वेदपाठक आदी उपस्थित होते. सुत्रसंचालन विजय पवार, आभार प्रशांत शेडगे यांनी मानले.

**महिला सर्वच क्षेत्रात योगदान हे पुरुषांच्या बरोबरीचे किंवा काही क्षेत्रात काकणभर अधिकच आहे. सरकार महिलांसाठी विविध योजना राबवित असून त्यांचा फायदा महिलांनी घेण्यासाठी महसूल प्रशासनातर्फे सर्वतोपरी सहकार्य केले जाते.**
**-विजय पाटील, तहसीलदार, पनवेल**

# रबाळेत जागतिक महिला दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका संचलित पीएम श्री राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय आंबेडकर नगर रबाळे नवी मुंबई येथे आज जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सुरुवातीलाच राजर्षी छत्रपती शाहू महाराज, माजी सनदी अधिकारी सुनील सोनी, माता रमाई, भीमाई, सावित्रीबाई फुले, अहिल्यामाता होळकर यांच्या प्रतिमांना मान्यवरांच्या हस्ते अभिवादन करण्यात आले.

शाळेच्या सुनील सोनी सभागृहात सर्व महिला शिक्षकांना सन्मानाने टाळ्यांच्या गजरात आमंत्रित करण्यात आले व तदनंतर त्यांचा तुळशीचा रोप देऊन जया नगराळे, राजश्री उमराणीकर, नीतू गावि, शिल्पा टिकले, अस्मिता सन्मुख, मीना सुतार ,सोनी यादव, वृषाली सावंत, द्वारकाबाई वाघे यांचा सन्मान करण्यात आला व सामूहिक रीत्या केक कापून जागतिक महिला दिनाचा आनंद साजरा करण्यात आला.

महिला दिनाचे महत्त्व क्रीडा शिक्षक प्रा.अमोलकुमार वाघमारे यांनी सांगीतले त्यानंतर महिला दिनानिमित्ताने मनोगत शिक्षिका वैशाली धनावडे, ॲड रोहिणी पाटील, माजी अपक्ष गटनेता गौतमी सोनवणे-साबळे, मुख्याध्यापक अमोल खरसंबळे यांनी केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दिलीप निंबारा यांनी केले शेवटी आभार मेथाजी देसाई यांनी मानले.



# पिरकोन येथील रोजगार मेळाव्याचा बेरोजगारांनी लाभ घेण्याचे आवाहन

**उरण : प्रतिनिधी**

लायन्स क्लब ऑफ पनवेल, द्रोणागिरी व उरण आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स, पनवेल व अविनाश म्हात्रे, पाले व मित्र परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने २३ मार्च २०२५ रोजी सकाळी १० ते ३.३० वा. या वेळेत उरण तालुक्यातील पिरकोन येथील रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कृ.द. जोशी सभागृहात भव्य दिव्य असे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

उमेदवारांनी आपली नावनोंदणी करण्यासाठी खाली दिलेल्या लिंकला क्लीक करून किंवा गूगल वर सर्च केल्यानंतर येणाऱ्या अर्जाला पूर्णपणे भरून स्वतःची नाव नोंदणी करावी.

https://bit.ly/pirkonjobfairšregistration या लिंकद्वारे नाव नोंदणी करावी.या मेळाव्यात विविध नामांकित कंपन्या व नियोक्त्यांकडून रिक्त पदे भरण्यात येणार आहेत. या रिक्त पदांसाठी पात्रतेप्रमाणे उमेदवाऱ्याच्या नोंदणी व प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येणार आहेत.

या सुवर्ण संधीचा लाभ घेण्यासाठी उरण तालुक्यातील पिरकोन येथील रयत शिक्षण संस्थेचे कर्मवीर भाऊराव पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय कृ.द. जोशी सभागृह येथे उपस्थित रहावे, असे आवाहन लायन्स क्लब ऑफ पनवेल, द्रोणागिरी व उरण आणि यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्स, पनवेल व अविनाश म्हात्रे व मित्र परिवार पाले यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल उलवेचा पहिला वार्षिक बक्षीस वितरण समारंभ सोमवारी (दि.१०) आयोजित करण्यात आला होता आणि अध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते बक्षिसे प्रदान करण्यात आली.

२०२४-२५ या शैक्षणिक सत्रात विद्यार्थ्यांनी केलेल्या प्रामाणिक प्रयत्नांचे कौतुक करण्याची आणि त्यांना बक्षीस देण्याची ही वेळ होती. शाळेने नर्सरी ते सातवी पर्यंतच्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सन्मान केला, १५० विद्यार्थ्यांना त्यांच्या उत्कृष्टतेबद्दल सन्मानित करण्यात आले.

इयत्ता सातवीच्या कुमार शौर्य पवार आणि इयत्ता सहावीची कुमारी दृश्या यांना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सर्वाधिक पदके प्रदान करण्यात आली.



शाळेच्या गायनगटाच्या प्रार्थना आणि स्वागत गीताने समारंभाची सुरुवात झाली. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष, लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विजेत्यांना त्यांच्या मनाची इच्छा पूर्ण करण्यासाठी पुढे जाण्यास प्रेरित केले. त्यांनी या संस्थेचा अविभाज्य भाग असलेल्या मूल्यांचे पालनपोषण करत राहिल्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

हा केवळ पुरस्कार विजेत्यांसाठीच नाही तर त्यांच्या मुलांच्या यशाचे गौरव करणाऱ्या पालकांसाठीही अभिमानाचा क्षण होता.

या कार्यक्रमाला जे.बी.एस.पी. संस्था उपाध्यक्ष वाय.टी. देशमुख, वैभव एंटरप्रायझेसचे व्यवस्थापकीय संचालक वैभव देशमुख, आर.टी.पीएस. उलवे अध्यक्ष भार्गव ठाकूर, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, शाळा समिती सदस्य जयवंत देशमुख, विश्वनाथ कोळी, भाजप नेते किशोर पाटील, किशोर घरत, अंकुश ठाकूर, साईचरण म्हात्रे उपस्थित होते.

मुख्याध्यापिका चष्मिंदर बक्षी यांनी विजेत्यांचे अभिनंदन केले आणि भविष्यात कठोर परिश्रम करत राहण्यास सांगितले.

# फुंडे येथे व्यवस्थापन व विपणन प्रदर्शन

**उरण : वार्ताहर**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील वीर वाजेकर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात व्यवस्थापन व विपणन प्रदर्शनीचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचे आयोजन बीएमएस आणि बीएएफ विभागाच्या वतीने करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर उपस्थित होते.



या प्रदर्शनीचे मुख्य उद्दिष्ट विद्यार्थींच्या व्यवस्थापन व विपणन संकल्पनांवरील सखोल ज्ञानात वृद्धी करणे तसेच व्यावहारिक कौशल्यांचा विकास घडवणे हे होते. विद्यार्थ्यांनी विविध सादरीकरणे, प्रात्यक्षिके आणि चर्चांमधून व्यवस्थापन व विपणन तंत्रांचा उपयोग कसा करता येतो याचा अनुभव घेतला.

विशेष म्हणजे, तू. ह. वाजेकर ज्युनियर कॉलेज, फुंडे येथील कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनीही या प्रदर्शनाला भेट दिली. या माध्यमातून त्यांना व्यवस्थापन व विपणन क्षेत्रातील संकल्पना आणि व्यावसायिक कौशल्ये प्रत्यक्ष अनुभवण्याची संधी मिळाली.

कार्यक्रमासाठी बीएमएस विभागप्रमुख भूषण ठाकूर आणि विभागातील प्राध्यापक प्रियांका ठाकूर, दीक्षिता म्हात्रे, रेणू सरोज आणि आरती पाटील यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच, या प्रदर्शनीचे परीक्षक म्हणून प्रांजल भोईर आणि तन्वी कोळी यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांचे मूल्यांकन केले.

कार्यक्रमाच्या वैशिष्ट्यपूर्ण घटकांपैकी एक म्हणजे प्राचार्य डॉ. आमोद एन. ठक्कर यांनी विद्यार्थ्यांच्या सादरीकरणांना मार्गदर्शन केले. त्यांनी विविध व्यवस्थापन आणि विपणन तंत्रांवर विद्यार्थ्यांशी संवाद साधला व त्यांचे प्रकल्प अधिक प्रभावी कसे होतील याविषयी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्राचार्य डॉ. आमोद एन. ठक्कर यांनी बीएमएस आणि बीएएफ विभागातील सर्व अध्यापकवर्गाचे विशेष कौतुक केले व त्यांचे अभिनंदन केले. त्यांच्या अथक परिश्रमाने व उत्कृष्ट नियोजनामुळे उपक्रम यशस्वीपणे झाला.

एकूण २१० विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना व्यवस्थापन व विपणनातील धोरणे समजून घेता आली, तसेच समस्या सोडवण्याची व निर्णय घेण्याची कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळाली. ही प्रदर्शनी यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतलेल्या सर्व शिक्षकांना आणि विद्यार्थ्यांना प्राचार्यांनी शुभेच्छा दिल्या.

# विश्वनिकेतन कॉलेजमध्ये दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

कुंभवली खालापूर येथील विश्वनिकेतन इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये ६ व ७ मार्च २०२५ या कालावधीत इमर्जिंग ट्रेंड्स इन कॉम्प्युटर सायन्स अँड इंजिनिअरिंग या विषयावरील दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय संशोधन परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.

या परिषदेचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. नरेशकुमार हराळे, सीनियर व्हाईस प्रेसिडेंट एसबीआय यांच्या हस्ते झाले. उद्घाटनाच्या वेळी व्यासपीठावर मकरंद माने सीनियर प्रेसिडेंट ओरॅकल कंपनी, डॉ. ओम प्रकाश टेंभुर्णे एक्झिक्यूटिव्ह पब्लिशर स्प्रिंगर नेचर ग्रुप, विश्वनिकेतन इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य डॉ. बी आर पाटील, उपप्राचार्य डॉ. शंकर कदम, प्रो. शिवानी अग्रवाल आणि कॉन्फरन्स कन्वेनर डॉ. अंकुश पवार उपस्थित होते.

वेलकम भाषणामध्ये डॉ. अंकुश पवार यांनी आंतरराष्ट्रीय परिषदेबद्दल आढावा सादर केला. प्राचार्य डॉ. बी आर पाटील यांनी आलेल्या पाहुण्यांचे स्वागत करून कॉलेजबद्दल माहिती दिली.




या कॉन्फरन्समध्ये १२० प्रबंध ऑफलाईन आणि ऑनलाईनच्या माध्यमातून सादर करण्यात आले.

ही कॉन्फरन्स यशस्वी करण्यात को-कॅन्वेनर प्रा. अश्विनी गारोळे, प्रा. स्नेहा निंबारे, प्रा. महेश सुतार, प्रा. हेमंत कांबळे, प्रा. अक्सा सरनाईक, प्रा. रोहन पाटील, प्रा. ऋतिका मोहिते, प्रा. सानिका सुतार यांनी मोलाची भूमिका बजावली.

# शिरवणेतील महिलांना आरी वर्कचे प्रशिक्षण

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका महिलांसाठी विविध उपक्रम राबवत आली आहे. महिला स्वावलंबी व्हाव्यात यासाठी विविध योजना पालिकेने कार्यरत केल्या आहेत. त्या अंतर्गत समाजविकास विभागाने शिरवणे गाव आणि नेरूळ सेक्टर-१ येथील महिलांना 'आरी वर्क'चे प्रशिक्षण देण्यात येत आहे.

आरी वर्क हा हाताने भरतकामाचा एक प्रकार आहे. आरी भरतकाम ही भारतीय फॅशन आणि संस्कृतीचा अविभाज्य भाग बनली आहे. त्यामुळे विदेशात देखील या भारतीय पद्धतीला मागणी आहे. पालिकेच्या समाजविकास विभागाच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यात येतात. त्यामुळे महिला प्रशिक्षण घेऊन स्वावलंबी होतात. असे अनेक उपक्रम समाज विकास विहंग राबवत असल्याचे माजी नगरसेविका माधुरी सुतार यांनी सांगितले.

शिरवणेतील महिला, तरुणींनी मोफत प्रशिक्षणात सहभागी होण्याकरीता शिरवणे गाव येथे सामाजिक कार्यकर्ते जयेंद्र सुतार यांच्या जनसंपर्क कार्यालयात नाव नोंदणी करावी, अशा महिलांना पूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे आवाहन माधुरी सुतार यांनी केले आहे.

## निवडक

### रोजगार प्रशिक्षण कोर्सबाबत आवाहन

**रायगड :** सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्यामार्फत जिल्ह्यातील माजी सैनिक, माजी सैनिक पत्नी, माजी सैनिक विधवा व त्यांच्या पाल्यांकरीता अल्पकालावधीचे (१५० ते ८१० तासांचे) रोजगारासंदर्भात प्रशिक्षण कोर्ससाठी ऑनलाईन नोंदणी करावयाची असून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, रायगड-अलिबाग ले.कर्नल राहुल वैजनाथ माने (नि.) यांनी केले आहे. प्रशिक्षणासाठी १३५ विविध कोर्सची यादी https://bit.ly/SKILLCOURSES या लिंकवर देण्यात आलेली आहे. १२ मार्च २०२५ सायं.६ वाजेपर्यंत फॉर्म भरणे आवश्यक आहे.

### उतेखोलवाडी शाळेत महिला दिन

**माणगाव :** नगरपंचायत हद्दीतील पीएमश्री शाळा उतेखोलवाडी येथे महिला दिनानिमित्त महिला भगिनींचा सन्मान करण्यात आला. आदर्श शिक्षिका विनय जाधव यांनी पुढे होऊन सर्व शिक्षकांसमवेत उत्कृष्ट अशा २१ महिलांचा केंद्रप्रमुख शंकर शिंदे यांचे मार्गदर्शन घेत कनिष्ठ शिक्षिका स्नेहल उतेकर यांचे सहकार्य घेत तसेच व्यवस्थापन समिती यांचे सहकार्य घेऊन सुंदर असा भव्य दिव्य सोहळा पीएमश्री शाळा कुठे कोरवाडी येथे जागतिक महिला दिनानिमित्त उत्साहात केला.

# पोलिसाला मारहाणप्रकरणी दोघांना अटक

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मध्यरात्रीस एकटे असल्याचा फायदा घेवून रेवदंडा पोलीस ठाण्याचे बाहेरील प्रांगणात सहा.फौजदार दिनेश पिंपळे यांना मारहाण केल्याच्या आरोपावरून दोघांना अटक करण्यात आली आहे.

साळाव चेकपोस्ट ते बोर्ली या मार्गातील सार्वजनिक रस्तात ९ मार्च रोजी रात्री सव्वा बाराचे सुमारास झीशान उलहक वसीम सातारकर वय २५ वर्षे यांच्या मालकीचा पिकअप टेम्पो वाहतुकीस अडथळा येईल अश्या पध्दतीने उभा होता. या वेळी रात्रीस डयुटीवर असलेले रेवदंडा पोलीस ठाण्याचे सहा.फौजदार दिनेश पिंपळे यांनी पिकअप टेम्पो मालक झीशान उलहक वसीम सातारकर वय २५ वर्षे व सर्वेश सुनील ठाकूर या दोंघाना हटकले व रेवदंडा पोलीस ठाणे येथे आणले.




या वेळी पिकअप टेम्पो मालक झीशान उलहक वसीम सातारकर हे रेवदंडा पोलीस ठाण्यात फौजदार दिनेश पिंपळे यांचेशी वाद घालून अरेरावीची भाषा करू लागले म्हणून दोघाना पोलीस ठाण्यातून बाहेर जाण्यास सांगितले. या वेळी सहा. फौजदार दिनेश पिंपळे हे त्यांचे पाठोपाठ रेवदंडा पोलीस ठाणे बाहेर उभ्या असलेल्या पिकअप टेम्पोतून कागदपत्रे आणण्यासाठी बाहेर आले. यावेळी सहा. फौजदार दिनेश पिंपळे कारवाई करत असल्याचा राग मनात धरून झीशान उलहक वसीम सातारकर यांनी त्यांचे शर्ट खेचून हाथाबुक्काने मारहाण करून हातातील दगड डावे हाताच्या पंजावर मारून दुखापत केली. या झटापटीत त्यांचे उजव्या हाताच्या मनगटावर खरचटले.

या झटापटीत सर्वेश सुनील ठाकूर यांनी मार मार, असा गोंगाट करून त्यांचे अंगावर मारहाणीसाठी धावून गेला. प्रसंगी त्याचे शासकीय गणवेशावरील नंबर प्लेट व शर्टचे बटन तुटले अशी तक्रार सहा. फौजदार दिनेश पिंपळे यांनी रेवदंडा पोलीस ठाणे येथे नोंदविली आहे. याबाबत रेवदंडा पोलीस ठाणे येथे पिकअप टेम्पोचे मालक झीशान उलहक वसीम सातारकर व सर्वेश सुनिल ठाकूर यांचेवर भादवी कलम २०२३ चे १२३,१२१,(१),३२४(२),३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोसई दगडू गांगुर्डे हे करत आहेत.

## जागतिक महिला दिनी सुप्रभा नर्सरीचे उद्घाटन



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**


सोगाव येथील सुप्रभा नर्सरीचे उद्घाटन जागतिक महिला दिनी रायगडचे जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या हस्ते झाले.

या वेळी लोकनेते सुनील उर्फ आप्पासाहेब थळे, दैनिक रामप्रहरचे मुख्य संपादक देवदास मटाले, रोटरी क्लब ऑफ अलिबागचे अध्यक्ष व कृषी अधिकारी भडसाहेब, पेण येथील नर्सरी तज्ज्ञ तुळशीराम गायकवाड, अलिबाग येथील अंकुर नर्सरीचे संचालक उध्दव पाटील, अलिबाग प्रेस असोसिएशनचे अध्यक्ष प्रकाश सोनावडेकर, नागाव येथील निलय रिसॉर्टचे संचालक मोहनराव सामंत, सामाजिक कार्यकर्ते समद कूर, सचिन घाडी, हेमंत नेमन, लियाकत कप्तान, इस्माईल, बाबूशेट आदी उपस्थित होते.

## महिला पोलिसांनी १२० फूट डोंगरावर अनुभवला रॅपलिंगचा थरार

**खोपोली : प्रतिनिधी**

यशवंती हायकर्स खोपोली व रायगड पोलीस यांच्या संयुक्त विद्यमाने झेनित वॉटर फॉल च्या १२० फूट फूट उंच डोंगरावर रविवारी रायगड जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यातील जवळपास ४५ महिला पोलीस व अधिकारी यांनी डव्हेंचर ॲक्टिव्हिटी करत रॅपिलिंगचा अनुभव घेतला.



या कार्यक्रमास पोलीस कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढविण्यासाठी महाराष्ट्र राज्य मुख्यमंत्री कार्यालय सचिव श्रीकर परदेशी, रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे हे स्वतः उपस्थित राहिले. ते फक्त उपस्थित राहिले नाहीत तर त्यांनी स्वतः हा ॲक्टिव्हिटी चा आनंद घेतला. त्यांच्या बरोबर डीवायएसपी विक्रम कदम आणि खोपोली पोलीस निरीक्षक शितल राऊत व अन्य अधिकारी ही उपस्थित होते. या सर्वांनी ॲक्टिव्हिटी करत महिला पोलिसांचे मनोधैर्य वाढविले.

ॲक्टिव्हिटीची सुरुवात करताना अर्चना संदीप पाटील यांनी प्रात्यक्षिक करून दाखवले. तसेच महिला पोलिसांच्या वतीने सुरुवात खोपोली पोलीस स्टेशनच्या एपीआय चव्हाण मॅडम ह्यांनी केली. असा अनोखा महिला दीन यशवंती हायकर्स व रायगड पोलिसांनी खोपोलीमध्ये साजरा केला. हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी खोपोली वरिष्ठ पोलिस निरीक्षक शीतल राऊत व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी भरपूर मेहनत घेतली.

यशवंती हायकर्सचे मच्छिंद्र यादव, पद्माकर गायकवाड, महेंद्र भंडारे, संदीप पाटील, अर्चना पाटील, सदाशिव पाटील, निखिल गुरव, अरविंद पाटील, प्रणित गावंड, अभिजीत देशमुख, मुकेश गायकवाड, राहुल कोरडे, अजय फाळे, शुभम पाटील, श्रीपाद पवार, अभिजित आंग्रे यांनी हा उपक्रम यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली. यशवंतीच्या ह्या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

## उंबरे ग्रामपंचायतीकडून महिलांसाठी विविध कार्यक्रम

**चौक : प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून ग्रुप ग्रामपंचायत उंबरे यांच्याकडून महिलांसाठी विविध कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात आले. या दिनाचे औचित्य साधून क्रॉलिजन्स प्रा.ली.या कंपनीकडून रुग्णवाहिका भेट देण्यात आली.

ग्रुप ग्रामपंचायत उंबरे ही खालापूर तालुक्यातील दुर्गम भागातील ग्राम पंचायत आहे. आजही या ठिकाणी नेट उपलब्ध नसते. आज ग्रामपंचायत उंबरे यांनी ग्राम पंचायत हद्दीतील महिलांसाठी विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून बचत गट, विविध संस्था यांच्या माध्यमातून उपक्रम राबविले. ग्रामपंचायत हद्दीतील अनेक वाड्या वस्त्या दुर्गम भागात आहेत, दळणवळण साधन उपलब्ध नसते. त्यामुळे आरोग्य सेवादेखील कोलमडून पडलेली असते, या भागात अपघात प्रमाण जास्त आहे. वेळीच काही साधन उपलब्ध होत नाही, त्यामुळे ग्रामपंचायत उंबरे यांच्या प्रयत्नाने ग्रामस्थांसाठी क्रॉलिजन्स कंपनीच्या सी.एस.आर.फंडातून रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आली आहे.

कंपनीचे संचालक अंकित पहारिया, संचालक आयुष जैन, जनरल मॅनेजर दीपक बगडा, प्रशांत वालेकर, ग्राम पंचायत अधिकारी अविनाश पिंपळकर, लक्ष्मण येरम, विठ्ठल माने, दत्तात्रेय मुसळे यांच्यासह कंपनी अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## रेवदंड्यात भाजी विक्रेत्यांना ऐन उन्हाळ्यात छत्रीचा आधार



**रेवदंडा : प्रतिनिधी**

ऐन उन्हाळ्यात कडक ऊन डोईवर आले असताना, पारनाका येथील भाजी विक्रेत्यांना सावलीसाठी चक्क छत्रीचा आधार घ्यावा लागतो आहे.

रेवदंड्यात भाजी मार्केटचा प्रश्न ऐरणीवर असून संबधीत प्रश्न सोडविण्यात चक्क अपयशी ठरले आहेत. गेले अनेक वर्ष भाजी विक्रेत्यांना ऐन उन्हाळ्यांत सावलीसाठी तर पावसाळयात पाऊसापासून बचाव करण्यासाठी चक्क छत्रीचा आधार घ्यावा लागतो आहे. सद्यस्थितीत ऐन उन्हाळ्यात कडक उन्हापासून बचाव करण्यासाठी भाजी विक्रेते छत्री उघडून भाजी विक्री व्यवसाय करीत आहेत.

रेवदंडा शहर मध्यवर्ती ठिकाण असल्याने आजूबाजूच्या पंचक्रोशीतील भाजी विक्रेते व्यवसायासाठी ताजी भाजी उपलब्ध करीत असतात, ताजी भाजीसह कडधान्ये, चिंच, आंबे, सफेद कांदे, कलिगंडे आजूबाजूच्या बागायतीमधील विविध फळे पारनाका येथील भाजी विक्रेत्यांकडे उपलब्ध असते, उन्हाळयातील कडक सुर्य किरणे डोक्यावर सहन होत नाही, अश्या परिस्थितीत भाजी, फळे, कडधान्य व्यवसाय करणे फार जिकीरीचे बनते.

पंचक्रोशीतून भाजी मार्केट मध्ये खरेदी ग्राहक येत असतात त्यांनासुध्दा ऐन उन्हात खरेदी करावी लागते. भाजी मार्केटचा प्रश्न अनेक वर्ष रेंगाळत राहीला असून संबधीत गांर्भियांने पहात नाही.

रेवदंडा शहरात अनेक वर्ष भाजी मार्केट सुविधा नाही, त्यामुळे भाजी विक्रेत्यासह खरेदीदारांना सुध्दा उन्हाळयात व पावसाळयात त्रास सहन करावा लागतो. भाजी मार्केटप्रमाणे मच्छी मार्केटचासुध्दा प्रश्न आहे. रेवदंडा हायस्कूलच्या बाजूच्या गल्लीत रस्तावर तसेच आत गल्लीत मच्छी विक्री व्यवसाय केला जात आहे.

या ठिकाणी नित्याने बाहेरील वाहनांची कोंडी होते तर रेवदंडा समुद्र किनारी ये-जा करताना पर्यटकांनासुध्दा अडथळा निर्माण होतो. रेवदंडयातील भाजी मार्केट व मच्छी मार्केट हे जिव्हाळयाचे प्रश्न केव्हा सुटणार, असा प्रश्न पंचक्रोशीतील ग्रामस्थ करत आहेत.

## पोलादपुरात महिला दिनी शब्दकोडे स्पर्धा यशस्वी

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुका वाचनालय, पोलादपूरतर्फे जागतिक महिला दिनानिमित्त महिलांसाठी सायंकाळी श्रीराम मंदिरामध्ये शब्दकोडे स्पर्धेचे आयोजन यशस्वीरित्या करण्यात आले. या वेळी साहित्यिका अरूणा अजित भागवत आणि माजी नगराध्यक्षा अश्विनी गांधी यांच्याहस्ते सावित्रीबाई फुले यांच्या तसबिरींना पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले.

या वेळी अरूणा अ.भागवत यांनी जागतिक महिला दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देत मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर महिला दिनी शब्दकोडे स्पर्धेचे आयोजन करण्यात येणे, हा दुग्धशर्करा योग असून अधिकाधिक महिलांनी शब्दकोडे बरोबर सोडवून बक्षिसाचे मानकरी होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

या वेळी ग्रंथपाल निकीता अ.शेठ यांनी ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यक्रमावेळी या स्पर्धेतील विजेत्यांना बक्षिसे देण्यात येतील, अशी माहिती दिली. श्रीराममंदिरामध्ये सुमारे ३० हून महिला स्पर्धकांनी शब्दकोडे स्पर्धेत सहभाग घेतला. या वेळी तालुका वाचनालयाचे चेअरमन डॉ.संजय शेठ आणि ग्रंथपाल निकीता अ.शेठ यांनी सर्व स्पर्धक महिलांचे स्वागत केले.



## ओजस्विनी पुरस्काराने कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

**पेण : रामप्रहर वृत्त**

अखिल भारतीय आगरी साहित्य संस्था आयोजित महिला दिन विशेष कार्यक्रम रविवारी (दि.९) खारपाडा येथील हंसाराम बुवा फार्म वर ज्येष्ठ साहित्यिक सुरेश भोपी यांच्या अध्यक्षतेखाली मोठ्या उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस अमृत पाटील यांनी इशस्त्वन सादर केले.

गजानन म्हात्रे यांनी प्रास्ताविक भाषण सादर केले. अ.भा.स.चे अध्यक्ष कैलास पिंगळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. आगरातील ओजस्विनी या नावाने महिला दिनाचे औचित्य साधून सौ मीनाक्षी तांडेल, संध्या दिवकर, रेखा थळे या कर्तृत्ववान महिलांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. शाल, सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते.



चंद्रकांत पाटील, अविनाश पाटील, मिनाक्षी तांडेल, संध्या दिवकर, शोभा पाटील यांनी आपल्या भाषणातून आगरी महिलांचे कर्तृत्व व आगरी संस्कृती या बाबतचे आपले विचार मांडले. आगरी संस्थेद्वारा ११ एप्रिल रोजी भूतानच्या थिंफू राजधानीत आंतरराष्ट्रीय आगरी अस्मिता साहित्य संमेलन होणार असल्याचे संस्थाध्यक्ष कैलास पिंगळे यांनी जाहीर केले.

गजानन म्हात्रे हे कार्याध्यक्षपदावर काम करणार असून, स्मितातार्ई वाजेकर यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार असून अमृत पाटील अध्यक्ष असणार आहेत. संमेलनात आगरी बोली या विषयावर परिसंवाद होणार असून, कविता सादरीकरणासोबतच अनेकविध पुस्तकांवर साहित्यिक चर्चा झडणार आहेत.

आगरातील ओजस्विनी या महिला दिन विशेष कार्यक्रमात कैलास पिंगळे अलिबाग, मिलिंद खारपाटील चिरनेर, अरुण धर्माजी पाटील पेण, संध्या विजय दिवकर रोहा, स्मिता वाजेकर नवी मुंबई, चंद्रकांत पाटील पेण, सुरेश भोपी कामोठे, भ पो म्हात्रे उरण, दिनानाथ पाटील पेढांबे, मिनाक्षी तांडेल नवी मुंबई, अविनाश पाटील पनवेल, अरविंद पाटील रोहा, गजानन म्हात्रे नेरूळ, मारुती बागडे कर्जत, रेखा चंद्रशेखर थळे अलिबाग, जी एच ठाकूर दादर पेण, अमृत पाटील नेरूळ, अरुण द म्हात्रे जासई, नंदेश गावंड अलिबाग, तृप्ती नंदेश गावंड अलिबाग या कवींनी सुरेख अशा कविता सादर करून सर्वांना खुर्चीस खिळवून ठेवले.

रेखा चंद्रशेखर थळे यांनी धवळेगीत सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. नंदेश गावंड व तृप्ती नंदेश गावंड या उभयतांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

## पोलादपुरात ज्येष्ठ नागरिक संघातर्फे विविध कार्यक्रम

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुका ज्येष्ठ नागरिक संघाच्या एकपात्री प्रयोग आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया उपक्रमांना ज्येष्ठ नागरिक संघाचे सदस्य महिला पुरूषांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संघाच्या संस्थापक अध्यक्षा कांचन शरद बुटाला यांनी श्रीस्वामी समर्थ मठामध्ये या उपक्रमांचे आयोजन केले.




असा मी असामी या पु.ल.देशपांडे यांच्या पुस्तकावर आधारित व्यक्तीरेखांचे सादरीकरण मराठी मालिकांतील अभिनेते सुबोध चितळे यांनी केले. या वेळी पु.ल.देशपांडे यांच्या व्यक्ती आणि वल्ली मधील अंतूबरवा हे पात्रदेखील सुबोध चितळे यांनी प्रेक्षकांसमोर साकारले. या वेळी विनोदी व्यक्तीरेखांचे भन्नाट सादरीकरण पाहताना ज्येष्ठ नागरिकांची हसून हसून मुरकुंडी वळली. यानंतर डॉ. पटवर्धन यांच्या नंदादीप नेत्रालयातर्फे मोफत नेत्रतपासणी करण्यात येऊन मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया तपासणीसाठी ज्येष्ठ नागरिकांसह पोलादपूर शहरातील नेत्ररूग्णांनी नोंदणी केली.

संघाच्या संस्थापक अध्यक्षा कांचन शरद बुटाला यांनी सुरूवातीला ज्येष्ठ नागरिकांनी वयाचा बाऊ न करता आपल्या कलागुणांना वाव देण्यासाठी सादरीकरण करण्याची गरज व्यक्त करून रेकॉर्ड डान्स सादर केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वामी सेवक अथर्व बुटाला यांनी केले.

## 'स्कॉफ'च्या सादरीकरणात शिक्षण परिषद

**मुरूड : प्रतिनिधी**

मुरुड येथील वळके केंद्राची फिरती शिक्षण परिषद ताडवाडी शाळेच्या सभागृहात झाली. जिल्हा परिषदेसहित विविध व्यवस्थापन आणि माध्यमांच्या शाळांमध्ये स्कॉफ अर्थात शालेय गुणवत्ता मूल्यांकन हमी आराखडा निश्चित करण्याच्या दृष्टीने परिषदेत नियोजन करण्यात आले.

मान्यवरांचे स्वागत, दीपप्रज्वलन, इतिवृत्त वाचन, प्रास्ताविक आणि शैक्षणिक चर्चा तसेच मंजिरी गायधनी आणि राजेंद्र नाईक यांनी प्रात्यक्षिकांसहित पीपीटी व व्याख्यान याद्वारे शिक्षकांचे उद्बोधन केले. या वेळी ताडवाडीचे ग्रामस्थ तथा मुरुड पंचायत



समितीचे माजी उपसभापती चंद्रकांत मोहिते यांनी शाळा इमारत आणि वर्गखोल्यांच्या सुंदर सजावटीचे कौतुक केले. वळके केंद्रप्रमुख महेश कवळे यांनीही परिसर स्वच्छता आणि एकंदर टापटीप, शैक्षणिक वातावरणास अनुकूल ठरणाऱ्या बोलक्या भिंती याबाबत तेथील शिक्षकांना कौतुकाची थाप दिली.

उपस्थितांमध्ये शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष प्रल्हाद पाटील, कार्यक्रम अध्यक्ष देवानंद गोगर, वळके हायस्कूलचे मुख्याध्यापक रमाकांत पाटील, जिंदल विद्यालयाचे सहायक शिक्षक औदुंबर ढगे, जगदीश चवरकर, बाळकृष्ण दरणे, सुरेखा खंडारे, राजाराम म्हात्रे, हेमंत म्हात्रे, मयुरेश जगताप, अपर्णा ठाकूर, रमेश भगत, गजानन दांडेकर, प्रियंका पाटील, चोरढे हायस्कूल प्रतिनिधी डोलकर तसेच केंद्रातील सर्व शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या दिमाखदार सोहळ्याचे सूत्रसंचालन महेश गायकवाड, तर आभार रेखा गोगर यांनी मानले.

# मुंबईचा गुजरातवर दणदणीत विजय

## डब्ल्यूपीएलमध्ये हरमनप्रीत कौरचे शानदार अर्धशतक

**मुंबई : प्रतिनिधी**

वूमन्स प्रीमियर लीगमध्ये मुंबई इंडियन्सने रोमांचक सामन्यात गुजरात टायटन्सचा नऊ धावांनी दणदणीत पराभव करत विजय मिळवला. मुंबईच्या संपूर्ण संघाने विजयामध्ये मोलाची भूमिका बजावली. हरमनप्रीत कौरने शानदार अर्धशतक झळकावले, तर अमेलिया करने तीन विकेट्स घेतल्या. हॅली मॅथ्यूजनेही तीन बळी टिपत अखेरच्या षटकात १२ धावांचा बचाव केला.



गुजरातने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला होता. मुंबईने कर्णधार हरमनप्रीत कौरच्या अर्धशतकाच्या जोरावर १७९ धावा केल्या. मुंबईकडून नवी सलामी जोडी हिली मॅथ्यूज (२५ धावा) आणि अमेलिया कर (५ धावा) लवकर बाद झाल्या. फॉर्मात असलेल्या नॅट स्किव्हर ब्रंट आणि हरमनप्रीत कौरने यांनी अर्धशतकी भागीदारी केली. नॅट सहा चौकारांसह ३८ धावा करीत, तर हरमनप्रीत ३३ चेंडूत नऊ चौकारांसह ५४ धावा करत बाद झाली. यानंतर अमनजोत कौरने २७ धावांची उत्कृष्ट खेळी केली. याशिवाय सजना सजीवनने २२ आणि यस्तिका भाटियाने १३ धावा करून संघाला १७९ धावांपर्यंत नेले.

मुंबईने दिलेल्या १८० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना गुजरातने ४१ धावांवर तीन विकेट्स गमावल्या. हरलीन देओल २४ आणि फिबी लिचफिल्ड २२ धावा करून परतल्या, पण भारतीय खेळाडू भारती फुलमालीने भारती फुलमालीने गुजरातकडून २५ चेंडूत चार षटकार आणि आठ षटकारांसह ६१ धावांची वादळी खेळी केली. सिमरन शेखने १६ चेंडूत १८ धावा करीत भारतीला चांगली साथ दिली. याशिवाय कोणतीही फलंदाज प्रभाव दाखवू शकली नाही आणि गुजरातचा संघ १७० धावांमध्ये गारद झाला. मुंबईकडून हिली मॅथ्यूज आणि अमलिया कर यांनी प्रत्येकी तीन विकेट्स, शबनम इस्माईलने दोन आणि संस्कृती गुप्ताने एक विकेट घेतली.

# स्वामी समर्थ श्री किताबाचा विश्वनाथ बकाली मानकरी

## महिलांच्या शरीरसौष्ठवात मनिषा हळदणकर अव्वल




**मुंबई : प्रतिनिधी**

प्रभादेवीच्या स्वामी समर्थ क्रीडा मंडळाच्या स्वामी समर्थ श्री राज्यस्तरीय शरीरसौष्ठव स्पर्धेत सांगलीचा विश्वनाथ बकाली विजेता ठरला. दिव्यांगांच्या गटात रत्नागिरीच्या गणेश गोसावीने, तर महिलांच्या गटात ठाण्याच्या मनिषा हळदणकरने बाजी मारली.

राज्यभरातून आलेल्या ९५ दर्जेदार स्पर्धकांच्या अटीतटीच्या लढतीत ठाण्याने मुंबई आणि उपनगरच्या तगड्या खेळाडूंना मागे टाकत बाजी मारली. आठपैकी तीन गटात ठाण्याच्या खेळाडूंनी अव्वल स्थान पटकावले, तर मुंबईच्या बप्पन दासलाच गटविजेतेपद जिंकता आले. शशांक वाकडेच्या अनुपस्थितीमुळे सांगलीच्या विश्वनाश बकालीपुढे कुणाचेच आव्हान टिकले नाही.

'स्वामी समर्थ श्री'च्या निमित्ताने प्रभादेवीत अक्षरशः पीळदार खेळाडूंचे झुंड पहायला मिळाले. दत्तु बांदेकर चौकात हजारो क्रीडाप्रेमींच्या उत्साहवर्धक उपस्थितीत झालेल्या या क्लासिकल स्पर्धेत खेळाडूंवर स्वामी समर्थ मंडळाने सव्वा तीन लाखांच्या रोख पुरस्कारांची उधळण केली.

स्पर्धा मुंबईत असली तरी या स्पर्धेत ठाणे, नाशिक, कोल्हापूर आणि अहिल्यानगरातील खेळाडू आपली करामत दाखवत होते. ५५ किलो वजनी गटात अव्वल स्थानासाठी प्रचंड चुरस पहायला मिळाली. कोल्हापूरच्या अवधूत निगडेने ठाणेकर सागर मानेला मागे टाकत यश संपादले. ६० किलो वजनी गटात ठाण्याचा आशिष खांडेकर पहिला आला, तर ६५ किलो वजनी गटात जागतिक कीर्तीचा नितीन म्हात्रे अव्वल ठरला. ७० किलो गटात मुंबईच्या बप्पन दासने बाजी मारली. मुंबईला एकमेव गट विजेतेपद त्यानेच जिंकून दिले. ७५ किलो गटात कोल्हापूरचा पंचाश्री लोणार पहिला आला. ८० किलो वजनी गटात सांगलीच्या हर्षद नेवेकरीने जळगावच्या जितेंद्र गिरीवर मात केली.

८५ किलो वजनी गटात विश्वनाथ बकालीच्या देहयष्टीसमोर कुणाचा प्रभाव जाणवला नाही. त्यामुळे किताबाच्या लढतीत त्याने आपल्या सातही प्रतिस्पर्ध्यांवर मात करत स्वामी समर्थ श्रीवर आपले नाव कोरले. जगज्जेता नितीन म्हात्रे उपविजेता ठरला.

# आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी सर्वोत्कृष्ट संघात सहा भारतीय खेळाडू; रोहितला मात्र स्थान नाही!

**दुबई : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाने १२ वर्षांनंतर रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली चॅम्पियन्स ट्रॉफीवर पुन्हा आपले नाव कोरले आहे. भारतीय संघाने गेल्या ९ महिन्यात ही दुसरी आयसीसी स्पर्धा जिंकली आहे. कर्णधार रोहितने अंतिम सामन्यात ७६ धावांची उत्कृष्ट खेळी खेळली आणि संघाच्या विजयाच्या पाया रचला. रोहितच्या नेतृत्वाचे सगळीकडे कौतुक सुरू असताना आयसीसीने मात्र वेगळाच निर्णय घेत सर्वांना चकित केले.

रोहितला अंतिम सामन्यातील त्याच्या खेळीसाठी सामनावीराचा पुरस्कारही देण्यात आला. पण एका दिवसानंतर जेव्हा आयसीसीने स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट संघ निवडला, तेव्हा रोहितला कर्णधार तर केलेच नाही, शिवाय १२ खेळाडूंमध्ये त्याचा समावेशही केला नाही, कारण अंतिम सामन्यापूर्वी भारतीय कर्णधाराला स्पर्धेत फार धावा करता आल्या नव्हत्या. संपूर्ण स्पर्धेत रोहितने पाच डावात केवळ १८० धावा केल्या, तर चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सर्वोत्कृष्ट संघात भारताचे सहा खेळाडू आहेत.

### असा आहे संघ

मिचेल सँटनर (कर्णधार), रचिन रवींद्र, इब्राहिम झादरान, विराट कोहली, श्रेयस अय्यर, केएल राहुल (यष्टीरक्षक), ग्लेन फिलिप्स, अजमतुल्ला ओमरझाई, मॅट हेन्री, मोहम्मद शमी आणि वरुण चक्रवर्ती, अक्षर पटेल (१२वा खेळाडू).

# अलिबाग येथे क्रिकेट स्पर्धा

**अलिबाग** : तालुक्यातील खानाव गावच्या नवतरुण स्पोर्ट्स क्लबच्या क्रीडांगणावर १६ ते २३ मार्च या कालावधीत जनता शिक्षण मंडळ अध्यक्ष अ‍ॅड. गौतमभाई पाटील प्रीमियर लीग लेदर बॉल टी-२० क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

स्पर्धा रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या मान्यतेने होणार असून अलिबाग तालुक्यातील खेळाडूंसाठीच आहे. निमंत्रित १२ संघांचा स्पर्धेत सहभाग असणार आहे. विजेत्या संघाला ५० हजार रुपये, उपविजेत्या संघाला २५ हजार रु. आणि दोन्ही संघांना आकर्षक चषक तसेच प्रत्येक सामन्यासाठी सामनावीर आणि संपूर्ण स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना चषक देऊन गौरविण्यात येणार आहे.

# नवी मुंबईत महिला मिनी मॅरेथॉनला उत्तम प्रतिसाद

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महापालिकेच्या सहयोगाने डॉ. डी.वाय. पाटील डिम्ड टू बी युनिव्हर्सिटी ऑफ हॉस्पिटॅलिटी अ‍ॅण्ड टुरिजम स्टडिज यांच्या माध्यमातून महिला मिनी मॅरेथॉन आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत २२००हून अधिक विविध वयोगटातील महिलांनी सहभागी होत उत्तम प्रतिसाद दिला.

### २२००हून अधिक महिलांचा सहभाग

'चला धावूया स्वच्छ नवी मुंबईसाठी' हा संदेश प्रसारित करण्याचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून डॉ. डी. वाय पाटील विद्यापीठाचे कुलपती तथा अध्यक्ष डॉ. विजय पाटील यांच्या संकल्पनेतून, उपाध्यक्ष डॉ. शिवानी पाटील व डी.वाय. पाटील क्लायमेट अ‍ॅक्शन लॅबच्या प्रमुख राजलक्ष्मी पाटील यांच्या वतीने ही मिनी महिला मॅरेथॉन घेण्यात आली.

### दामिनी पेडणेकर अव्वल

या स्पर्धेतचे विजेतेपद दामिनी पेडणेकर यांनी पटकाविले. द्वितीय क्रमांक प्रतिमा नसरत्ना व तृतीय क्रमांक सुजाता माने यांनी संपादन केला. ५ किमी अंतराच्या 'घे भरारी' शीर्षकांतर्गत आयोजित या महिला मिनी मॅरेथॉनमध्ये विविध वयोगटातील २२००हून अधिक महिलांनी सहभागी होऊन स्वच्छतेचा संदेश प्रसारित केला व आरोग्यपूर्ण जीवनाचे महत्त्वही अधोरेखित केले.

सायन-पनवेल महामार्गानजीक असलेल्या डॉ. डी.वाय. पाटील स्टेडियमच्या मुख्य प्रवेशद्वारापासून या महिला मिनी मॅरेथॉनला प्रारंभ झाला. अर्जुन पुरस्कार विजेत्या महापालिकेच्या क्रीडा विभाग उपायुक्त अभिलाषा म्हात्रे-पाटील यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून या महिला मॅरेथॉनला प्रारंभ झाला.



# धाटाव एमआयडीसीत मॅरेथॉनमधून आरोग्य, सुरक्षेबाबत जनजागृती

## सुदर्शन कंपनीची स्पर्धा उत्साहात

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्याच्या धाटाव एमआयडीसीत 'रन सेफ, स्टे सेफ, फिट सुदर्शन'चा नारा देत कंपनीने आरोग्य व सुरक्षा धोरणांचा पाया अधिक मजबूत केला. ५, १०, २१ किमी अशी मॅरेथॉन स्पर्धा वृक्षारोपणासह विविध सामाजिक उपक्रमांतर्गत रविवारी झाली. महिला, पुरुषांनी स्पर्धेत सहभाग घेत प्रतिसाद दिला.




सुदर्शन, नव्याने सहभागी झालेली ह्यूबॅक, जे.एम. राठी स्कूलचे अधिकारी, कर्मचारी यांनी सहकुटुंब यांनी मॅरेथॉनमध्ये सहभाग नोंदवला. यानिमित्ताने सकाळी परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.


स्पर्धेच्या ५ किमी गटात महिलांमध्ये नेहा कुमारी प्रथम, पल्लवी सातवे द्वितीय, ऋतुजा सावंत तृतीय, पुरुषांमध्ये अजय वारगुडे प्रथम, आशिष कुमार द्वितीय, रामचंद्र मार्जी तृतीय; १० किमी गटात महिलांमध्ये मयुरी निकम प्रथम, रूपाली देवरे द्वितीय, नयना कांबळे तृतीय, पुरुषांमध्ये रोहित बारडे प्रथम, प्रणव म्हसकर द्वितीय, कल्पेश जमदाडे तृतीय; तर २१ किमी पुरुष गटातून अक्षय पवार प्रथम, कार्तिक राणे द्वितीय, राज खांडेकर तृतीय यांनी विजयाची मोहर उठवली. विजयी स्पर्धकांना रोख रक्कम, सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

या वेळी बोलताना उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र दौंडकर यांनी, आजची मॅरेथॉन स्पर्धा, बक्षीस वितरण कार्यक्रमात सामूहिक शेतीतील शेतकरी, प्रत्येक गावाचा केलेला सन्मान सुदर्शनच्या सामाजिक, पर्यावरण, सुरक्षा बाबींची साक्ष देत आहे. आम्हालाही सुदर्शनच्या मॅरेथॉनमधून प्रेरणा मिळाली. आम्ही पोलीस प्रशासन लवकरच अशीच मॅरेथॉन स्पर्धा भरवणार आहोत, अशी प्रेरक भावना मनोगतातून व्यक्त केली.

'सुदर्शन'चे सर्वेसर्वा राजेश राठी यांनी व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे उपस्थितांना संबोधित करत फिट सुदर्शन उपक्रमाचे कौतुक केले.

पारितोषिक वितरण समारंभाला सुदर्शन कंपनीचे साईड हेड विवेक गर्ग, अविनाश पाटील, पोलीस निरीक्षक मारुती पाटील, सिव्हिल हेड सी.बी. जोशी, वरिष्ठ व्यवस्थापक अन्सार डांगे, एचपीपी हेड राकेश देवरे उपस्थित होते.

या वेळी सुदर्शन कंपनीने कृषी बांधिलकी जोपासत जिल्ह्यात सामूहिक शेती कृतिशील प्रयोग यशस्वी करत तरुणांमध्ये शेतीची आवड निर्माण करणाऱ्या बळीराजा फाऊंडेशनला सन्मानित केले. अध्यक्ष विठ्ठल मोरे, संस्थापक राजेंद्र जाधव व सहकाऱ्यांनी हा सन्मान स्वीकारला.



# राष्ट्रीय कॅरम स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे संघ जाहीर

**अलिबाग : प्रतिनिधी**

दिल्ली येथे होणाऱ्या ५२व्या वरिष्ठ राष्ट्रीय अजिंक्यपद कॅरम स्पर्धेसाठी महाराष्ट्राचे पुरुष व महिला संघ जाहीर करण्यात आले आहेत. १७ ते २१ मार्च या कालावधीत दिल्ली येथील तालकटोरा इनडोअर स्टेडियममध्ये ही स्पर्धा खेळली जाणार आहे.

महाराष्ट्राच्या संघांचे १२ ते १४ मार्च या कालावधीत एमसीए ट्रेनिंग सेंटर, सेंट्रल रेल्वे इन्स्टिट्यूट दादर येथे सराव शिबिर आयोजित करण्यात आले आहे. १५ मार्च रोजी महाराष्ट्राचा संघ दिल्लीला रवाना होईल.

**महाराष्ट्राचे संघ**

**पुरुष संघ** : विकास धारिया, संजय मांडे, फहिम काझी (सर्व मुंबई) सागर वाघमारे (पुणे), पंकज पवार (ठाणे), रिझवान शेख (मुंबई उपनगर) आणि संजय देसाई (संघ व्यवस्थापक).

**महिला संघ** : मधुरा देवळे, चैताली सुवारी (ठाणे), केशर निर्गुण, दीक्षा चव्हाण (सिंधुदुर्ग), रिंकी कुमारी, सिमरन शिंदे (मुंबई), प्राची जोशी (संघ व्यवस्थापक).

# चॅम्पियन्स ट्रॉफी विजयानंतर कॅप्टन रोहित शर्मा मायदेशी

## चाहत्यांकडून स्वागत

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाचा कर्णधार चॅम्पियन्स ट्रॉफी विजयानंतर मायदेशी परतला आहे. दुबईत झालेल्या फायनलमध्ये टीम इंडियाच्या विजयाचा हिरो ठरलेला कर्णधार रोहित सोमवारी संध्याकाळी मुंबईत आपल्या घरी परतला. या वेळी रोहितच्या स्वागतासाठी चाहत्यांची गर्दी विमानतळावर होती आणि रोहितने त्यांच्या प्रेमाबद्दल हात दाखवत आभारही मानले.



चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५च्या अंतिम सामन्यात भारताने रोहितच्या नेतृत्वाखाली न्यूझीलंडवर शानदार विजय मिळवला. भारताने किवी संघाचा चार गडी राखून पराभव केला आणि १२ वर्षांनंतर पुन्हा चॅम्पियन्स ट्रॉफीवर कब्जा केला. फायनलमध्ये ७६ धावा करून संघाला चॅम्पियन बनवण्यात कर्णधार रोहितने मोठी भूमिका बजावली.

भारताच्या या ऐतिहासिक विजयाच्या एका दिवसानंतर सोमवारी संध्याकाळी रोहित त्याच्या कुटुंबासह मुंबईला परतला. या वेळीही रोहित त्याची मुलगी समायराला उचलून घेत एअरपोर्टवरून बाहेर पडताना दिसला. रोहितसाठी एअरपोर्टवर पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त पहायला मिळाला. तरीही चाहत्यांनी रोहित शर्माची एक झलक पाहण्यासाठी तुफान गर्दी केली होती.

सर्वांनी भारतीय कर्णधाराच्या नावाने घोषणाबाजी करीत त्याचे जोरदार स्वागत केले. रोहितला घेण्यासाठी त्याची रेंज रोव्हर कार आधीच विमानतळाबाहेर तयार उभी होती. चाहत्यांकडून झालेले स्वागत, घोषणाबाजीदरम्यान रोहित आपल्या कारमध्ये बसून घराकडे निघाला. आयपीएल फ्रँचायझी मुंबई इंडियन्सनेही रोहितचा एक व्हिडिओ इन्स्टाग्रामवर पोस्ट केला आहे, तर काही वेळाने रोहितची पत्नी रितिका सजदेहदेखील त्यांच्या मुलासह एअरपोर्टबाहेर येताना दिसली.

### आता आयपीएलमध्ये दिसणार खेळाडू

या विजयानंतर आता कर्णधार रोहित शर्मासह सर्व खेळाडू पुढील काही दिवस विश्रांती घेतील आणि लवकरच मैदानात परततील. सर्व स्टार खेळाडू आता पुढील दोन महिने आयपीएल २०२५साठी सज्ज असणार आहेत. येत्या २२ मार्चपासून आयपीएलच्या १८व्या सीझनला सुरूवात होणार आहे. पहिला सामना कोलकाता नाईट रायडर्स वि. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू यांच्यात होणार आहे.




दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com